बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड बुधवार,दि.२५सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## सोलापूर विमानसेवेचा प्रारंभ

सोलापूर : सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घाईगडबडीत उरकला जात आहे. केंद्र सरकारने यापूर्वी १५ जून २०16 रोजी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातच सोलापूर विमानसेवेला मंजुरी दिली होती. परंतु त्या अनुषंगाने सोलापूरच्या छोटेखानी विमानतळावर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने उडान योजना सोलापूरकरांसाठी कागदावर राहिली होती. त्यानंतर सुमारे सात वर्षे विमान सेवेबाबत फारशा हालचाली झाल्या नव्हत्या.

## जरांगे पाटलांची प्रकृती खालावली



### आज महाराष्ट्र बंद : उपचार अन् पाणी पिण्यास नकार

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचं औचित्य साधत १६ सप्टेंबरपासून उपोषणाचे हत्यार उपसलं आहे. मनोज जरांगे पाटील यांचं जालन्यातील अंतरवाली सराटी येथे सगेसोयऱ्याची अंमलबजावणी आणि ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण मिळावं या प्रमुख मागणीसाठी आमरण उपोषण सुरू आहे. आज मनोज जरांगे पान २ वर...

# सेबीच्या अहवालामध्ये गोलमाल : गांधी

## सवाल: छोट्या गुंतवणूकदारांचे १.८ लाख कोटींचे नुकसान कसे?



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

सेबीने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात गेल्या तीन वर्षात शेअर बाजारातील 'फ्यूचर अँड ऑप्शन' ट्रेडिंगमुळे छोट्या गुंतवणूकदारांचे १.८ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती देण्यात आली आहे. यावरूनच आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी सेबीला लक्ष्य केलं आहे. छोट्या गुंतवणूकदारांच्या तोट्यातून पैसे कमावणारे 'मोठे खेळाडू' कोण आहेत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.राहुल गांधी यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत यासदंर्भात प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या पाच वर्षांत फ्यूचर आणि ऑप्शन ट्रेडिंगमध्ये ४५ पटीने वाढ झाली आहे. तर गेल्या तीन वर्षांत ९० टक्के छोट्या गुंतवणूकदारांचे १.८ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या छोट्या गुंतवणूकदारांचे आर्थिक नुकसान करणाऱ्या तथाकथित 'मोठ्या खेळाडूंची' नावे सेबीने जाहीर करावीत. अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

### सेबीच्या अहवालात नेमकं काय?

दरम्यान, सेबीने सोमवारी जाहीर केलेल्या अहवालानुसार, २०२३-२०२४ या वर्षात फ्युचर्स आणि ऑप्शन्स ट्रेडिंगमुळे ७३ लाख व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झालं आहे. त्यानुसार प्रत्येक व्यापाऱ्याचं सरासरी १.२ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याशिवाय फ्युचर्स आणि ऑप्शन्स करणाऱ्या एक कोटी पेक्षा अधिक व्यापाऱ्यांपैकी ९१ टक्के व्यापाऱ्यांना गेल्या तीन वर्षात म्हणजेच २०२२ ते २०२४ या आर्थिक वर्षात सरासरी प्रत्येकी २ लाख रुपयांचे नुकसान झालं आहे. तर गेल्या तीन वर्षांत या सेगमेंटमध्ये व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचं एकूण नुकसान १.८ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्यांचंही या अहवालात सांगण्यात आलं आहे.

## राजेभाऊ फड यांचा राष्ट्रवादी होणार प्रवेश

### पक्षांतर: खा.शरद पवारांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी प्रदेशध्यक्ष राजेभाऊ फड यांचा उद्या दि.२५ सप्टेंबर रोजी मुंबई येथे देशाचे नेते तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होणार आहे रासपाचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेभाऊ फड यांचा परळी मतदारसंघात जनसंपर्क आहे. विशेष म्हणजे राजेभाऊ फड यांचा अठरा पगड समाजातील नागरिकांचा चांगला संपर्क आहे सामाजिक धार्मिक काय कामात त्यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे. कन्हेरवाडी गावचे सरपंच आहेत परळी मार्केट कमिटीचे माजी



संचालक म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे. प्रत्येक समाजातील नागरिकांना त्यांची मोठी मदत असते विशेष पान २ वर...

## पुल कामामुळे घडू शकतात मृत्यू तांडव'

### सवाल: गुत्तेदाराचे डोके ठिकाण्यावर आहे का?

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुत्तेदारांच्या ढिसाळ काम नियोजना मुळे सिरसाळा -परळी चौपदरीकरण रस्ता कामा दरम्यान अनेक लोकांना अपघाती आपले प्राण गमवावे लागले आहेत. सिरसाळा - परळी रोडवरील अपघाताच्या अनेक घटना झालेल्या असतांना सिरसाळा-तेलगाव रोडवरील पुलाचे अंत्यत शुन्य नियोजनाचे काम गुत्तेदारांकडून केले जात आहे , सिरसाळा नजीक असलेले हे ठिकाण पुर्वी पासुन अपघातास प्रसिद्ध आहे. या ठिकाणी सतत अपघात होत असतात, रस्ता दोन्ही दिशेने वळणाचा आहे व उताराचा आहे. अर्धा किमी मोठ मोठ्या झाडांचा विळखा आहे .अशी





परिस्थिती असतांना सदरील रस्ता कामासाठी पूल खोदण्याचे काम सुरु केले आहे. रस्त्याची/पुलाची एक बाजू पुर्ण खोदली आहे . दुसरी बाजू पावसाने खचली आहे . या मुळे या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे . वेळीच गुत्तेदाराने गांभीर्य पुर्वक या ठिकाणी काम करायला हवे,नाहीतर अपघाताने मृत्यू तांडव झाल्याशिवाय राहणार नाही. आताचकसरतीने वाहन धारक या ठिकाणाहून जात आहेत. हे काम सुरु पान २ वर...

## परळी विधानसभा मतदार संघात चाचपणी

### पडघम :धनंजय मुंडेंच्या विरोधात सर्वपक्षीय 'आघाडी'

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रमुख राजकीय विरोधक असलेल्या पंकजा मुंडे यांच्याशी पक्षीय आणि कौटुंबीक पातळीवरही 'युती' असल्यामुळे राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना आव्हान देणाऱ्या नेत्याची परळी विधानसभा मतदारसंघात चाचपणी सुरू आहे. त्या मोहिमेअंतर्गतच स्थानिक राजकीय विरोधकांनी धनंजय मुंडेंविरोधात आघाडी उघडून एकीकरणाचा एक प्रयोग शेतकरी मोर्चाच्या माध्यमातून साधण्याचा प्रयत्न केला आहे. या मोर्चापासून काही नेते अंतर राखून असले तरी स्थानिक व राज्यस्तरावरील भाजपचे पदाधिकारीही थेट सहभागी झाले होते, हे विशेष. भाजपमधील स्थानिक एक गटही धनंजय मुंडेंच्या निकटवर्तीयांच्या कारभारावर नाराज असून आगामी निवडणुकीत महायुतीचा घटक पक्ष म्हणून प्रत्यक्ष काम करायचे की नाही, यावर त्यांच्यामध्ये सध्या खल सुरू आहे.या पार्श्वभूमीवर परळीत नुकतीच काही भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष, शेतकरी संघटना, कम्युनिस्ट पक्षातील नेत्यांची एक फळी धनंजय मुंडे यांच्याविरोधात एकवटली आहे. शेतकऱ्यांचा रखडलेला पीकविमा, सोयाबीन, कापसाला अधिकचा भाव मिळावा, आदी मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या ट्रॅक्टर,



बैलगाडी मोर्चाच्या आडून धनंजय मुंडे यांच्याविरोधात आघाडी उभी करून आव्हान उभे करण्याची धडपड सुरू आहे. धनंजय मुंडेंविरोधात उभे राहण्यासाठी विरोधी गटाकडून दररोज एक नाव समोर येत असून, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस सक्षम उमेदवाराची चाचपणी करत आहे. बीड जिल्ह्यातील काही नेत्यांनी शरद पवार यांची अलिकडेच भेट घेऊन परळीतून उमेदवारी मिळवण्यासाठी साखर पेरणी करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य पातळीवरील सत्तासमीकरणे बदलण्याचा राजकारणाचा नवा प्रयोग पुढे आला. भाजपचे कट्टर विरोधक असलेले अजित पवार हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील एक गट घेऊन थेट सत्तेत सहभागी झाले. तत्पूर्वीपर्यंत परळीच्या स्थानिक राजकारणात नात्याने चुलत भाऊ-बहीण असलेले धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांच्यात राजकीय संघर्ष सुरू असायचा. पान २ वर...

## म्हणून आमच्या भावना दुखवल्या आहेत

### सवाल : नंदकिशोर मुंदडा तुम्ही महापुरुष कधी?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदार संघातील मौजे जागोईवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात महापुरूष यांच्या प्रतीमे सोबत व खाली राजकीय नेते यांची प्रतीमा लावल्याने आमच्या भावना दुखावल्याने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की केज अंबाजोगाई मतदार संघातील मौजे जोगाईवाडी ग्रामपंचायत कार्यालयात शासकीय नियमानुसार जे राष्ट्रीय महापुरूष व स्वातंत्र्य सैनानी यांचे प्रतिमा लावण्याचा नियम आहे. परंतु सदर महापुरूषांच्या चित्रासोबत समाविष्ट नसलेले व नियमबाह्य स्वर्गीय मंत्री विमलताई मुंदडा यांची प्रतिमा महात्मा गांधी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या मधोमध प्रतिमा



बसवण्यात आली आहे. तसेच सदर प्रतिमेच्या खाली सर्व प्रतिमेपेक्षा मोठा फोटो नंदकिशोर मुंदडा यांचा बसवण्यात आला आहे. सदर बाब व्हिडीओ शुटींग व फोटो मध्ये कैद केली असून, अशा प्रकारे महापुरूषांच्या बरोबरीने राजकीय लोकांचे नियमबाह्य प्रतिमा लावल्याने आम्ही सर्व महापुरूष अनुयायी म्हणुन आमच्या प्रचंड भावना दुखावल्या आहेत. तरी सदर प्रकरणी दोषी ग्रामपंचायतचे सर्व जबाबदार पदाधिकारी कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्याचे निवेदन आपल्याकडे सादर करण्यात येत आहे. कारवाई न झाल्यास सदर घटनेच्या निषेधार्थ व कारवाईसाठी आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे पान २ वर...

## अक्षय शिंदेचा मृत्यू अतिरक्तस्त्रावामुळे

### पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये खुलासा

अक्षय शिंदे यांचा मृत्यू अति रक्तस्त्रावामुळे झाल्याचं शवविच्छेदन अहवालातून समोर आलं आहे. अक्षय शिंदेच्या डोक्याला एक गोळी लागल्याचं शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आलं आहे. हा शवविच्छेदन अहवाल मुंब्रा पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. जेजे रुग्णालयात सात तास सुरू असलेल्या शवविच्छेदन प्रकियेची व्हिडीओग्राफी देखील करण्यात आली आहे. जेजे रुग्णालयाच्या पाच डॉक्टरांच्या पॅनलनं अक्षय शिंदेचं शवविच्छेदन केलं आहे.

पोलीस चकमकीत ठार झालेला बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या डोक्यात गोळी लागल्यानं अतिरक्तस्त्राव झाल्यानं त्याचा मृत्यू झाला. अक्षयच्या पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये ही बाब समोर आली आहे.

#### सात तास चाललं पोस्टमार्टम

आरोपीचा प्राथमिक शवविच्छेदन अहवाल मुंब्रा पोलिसांकडे सोपवण्यात आला आहे. अक्षय शिंदेचं मंगळवारी पोस्टमार्टम करण्यात आलं, जे सुमारे सात तास चाललं आणि त्याची व्हिडीओग्राफीही करण्यात आली आहे. पाच डॉक्टरांच्या समितीनं अक्षय शिंदेचं शवविच्छेदन केलं. बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचं शवविच्छेदन करून ठाणे पोलीस रवाना झाले.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध बदलापूर लैंगिक पान २ वर...

**प्रश्नचिन्ह** अक्षय शिंदेच्या वडिलांची उच्च न्यायालयात धाव

# बदलापूर लैंगिक अत्याचाराचे प्रकरण

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथील शाळेतील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला सोमवारी पोलीस चकमकीत ठार करण्यात आले. या चकमकीविरोधात शिंदे याच्या वडिलांनी मंगळवारी उच्च न्यायालयात धाव घेतली. तसेच, पुरावे नष्ट करण्याची भीती व्यक्त करून याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. न्यायालयानेही याचिकेची दखल घेऊन बुधवारी सकाळच्या सत्रात प्रकरणाची सुनावणी ठेवली आहे.मुख्य न्यायमूर्ती रेवती



डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर शिंदे याच्या वडिलांच्यावतीने याचिका सादर केली. न्यायालयाने त्यांच्या वकिलाचे थोडक्यात म्हणणे ऐकल्यानंतर याचिका तातडीच्या सुनावणीसाठी बुधवारी ठेवली. या प्रकरणातील मूळ आरोपींना वाचविण्यासाठी अक्षयला चकमकीत ठार करण्यात आल्याचा आरोप करून या चकचकीबाबतचे पुरावे नष्ट करण्याची भीती शिंदे याच्या वकिलांनी पान २ वर...

### मुख्य आरोपींना वाचवण्यासाठी शिंदेचा बळी ?

या प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेच्या कथित चकमकप्रकरणी मंगळवारी माजी पत्रकार केतन तिरोडकर यांनीही याचिका दाखल केली. त्यात त्यांनी बदलापूर येथील संबंधित शाळेच्या विश्वस्तांवर मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा दावा केला आहे. तसेच, लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा गुन्हा नोंदवल्याच्या दुसऱ्याच दिवशी शाळेतून आणखी एक मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच पोलीस ठाण्यात दाखल केल्याचा दावाही तिरोडकर यांनी याचिकेत केला आहे. याप्रकरणात काही बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे, प्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करावा, अशी मागणी याचिकेत केली आहे. शिवाय, शिंदे याने कारागृहात असताना माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांना भेटण्याची इच्छा पोलिसांकडे बोलून दाखवली होती. आरोपी न्यायालयाने स्थापन केलेल्या विशेष समितीपुढे हजर झाल्यास प्रकरण वेगळ्याच वळणार जाईल, या भीतीपोटी चकमकीत त्याला मारण्यात आल्याचा आरोपही याचिकाकर्त्याने केला आहे.

## दिल्लीत उभं राहिलं संघाचं नवं मुख्यालय

### नियोजन : आधुनिकतेसह 'या' सुखसोयींनी सज्ज!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशाच्या राजधानीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं नवं मुख्यालय उभं राहतं आहे. या मुख्यालयाचं काम जवळपास संपत आलं आहे. १२ मजली इमारतीत संघाचं मुख्यालय विस्तारलं आहे. दिल्लीतल्या या मुख्यालयाची (ठ्ड्ड छ्शु क्शरर्वीर्रीशी ) खासियत काय आहे आपण जाणून घेऊ.संघाचं नवं मुख्यालय दिल्लीत उभं राहतं आहे. ही इमारत बारा मजल्यांची आहे. या इमारतीबाबत हरकत प्रमाणपत्र मिळावं म्हणून ऑगस्टमध्येच अर्ज करण्यात आला होता. दिल्लीच्या अर्बन आर्ट्स कमिशनने याला मान्यता दिली आहे. हे मुख्यालय जवळपास बांधून तयार आहे. पान २ वर...



#### २०० गाड्यांसाठी खास पार्किंग

केशवकुंजमद्ये एक ग्राहक वस्तू विक्री केंद्रही असणार आहे. ज्यामध्ये संघाचे गणवेश मिळू शकतील. तसंच इतर वस्तूही मिळतील. दुसर्या एका भागात संघाचं प्रकाशित साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात येईल. संघाची मुखपत्रं पांचजन्य आणि ऑर्गनायझर यांचे अंकही विक्रीसाठी ठेवण्यात येतील. या मुख्यालयात २०० हून अधिका गाड्या पार्क करता येतील एवढं पार्किंगही बांधण्यात आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

# दक्षिणेचा 'वाम'पंथ!

आर्थिक आव्हानांनी गांजलेला, संपत्ती निर्मिती आणि तिचे समन्यायी वाटप यात अपयशी ठरलेला समाज अंतिमत: डाव्या विचाराकडे वळतो. मग हा समाज अमेरिकेतील लक्ष्मीपुत्रांच्या 'वॉल स्ट्रीट' यशात वाटा न मिळालेला असो वा एके काळच्या साम्राज्यवादाचे प्रतीक असलेल्या इंग्लंडमधील असो. संपत्तीतील विषमता समाजास डावीकडे वळवतेच वळवते. या सत्याचे ताजे प्रतीक म्हणजे श्रीलंकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत अनुरा कुमारा दिसनायके या आतापर्यंत सत्तास्पर्धेत कधीही गांभीर्याने न घेतल्या गेलेल्या नेत्याचा अनपेक्षित विजय. बंदरनायके, राजपक्षे, गुणवर्धने, जयवर्धने अशा पारंपरिक धन आणि राजदांडग्या घराण्यांचा सहज पराभव करून अनुरा कुमारा दिसनायके अध्यक्षपदी निवडले गेले. ते श्रीलंका-बाह्य जगात अपरिचित आहेत हेच केवळ त्यांच्या विजयाची दखल घेण्याचे कारण नाही. तर ते मार्क्सवादी आहेत आणि चे गव्हेरा हा त्यांचा आदर्श आहे. अलीकडच्या काळात चे गव्हेरा याचे अस्तित्व सर्वसाधारणपणे तरुणांच्या टी-शर्टावरील चित्रापुरते उरले आहे किंवा काय असा प्रश्न पडण्याजोगी वैचारिकताशून्यता अनुभवास येत असताना चे गव्हेराचा कोणी अनुयायी आशिया खंडातील एखाद्या देशात अध्यक्षपदी निवडून येतो, ही बाब अद्भुत म्हणावी अशी. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात जगभरातील तरुण चे गव्हेरा, फिडेल कॅस्ट्रो आणि एकंदरच डाव्यांचे क्रांतीचे स्वप्नाळू आश्वासन यांनी भारलेले होते. नंतर सोव्हिएत युनियनचा पाडाव झाला आणि चीनने डाव्या विचारांस 'नियंत्रित भांडवलशाही'चे रूप दिले. असे असताना एकविसाव्या शतकात वंशवाद, त्यातून निर्माण झालेला दहशतवाद आदींनी खंगलेल्या श्रीलंकेसारख्या देशात मार्क्सवादी व्यक्ती अध्यक्षपदी निवडली जात असेल तर ती घटना अनेकार्थांनी दखलपात्र ठरते.म्हणूनच शब्दश: साऱ्या जगाचे लक्ष या निवडणुकीकडे होते आणि अनेक महत्त्वाच्या माध्यमांचे प्रतिनिधी या निवडणुकीच्या वार्तांकनासाठी तेथे तळ ठोकून होते. याचे कारण अर्थातच चीन. हे नवे अध्यक्ष डाव्या अंगाने एके काळी चीनवादी मानले जात. तथापि गेल्या काही वर्षांत चीनने त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा अप्रत्यक्षपणे जणू ताबा घेतला. त्यामुळे आपल्या आर्थिक विवंचनेस चीनदेखील जबाबदार आहे, ही धारणा श्रीलंकावासीयांच्या मनात होती. आणि आहेही. असे असताना डाव्या विचारांची व्यक्ती अध्यक्षपदी निवडली जाणे हे जनतेच्या मनातील भावना आणि त्यामागील राजकीय वास्तवासंदर्भात विसंवादी ठरते. या निवडणुकीत अनुरा कुमारा दिसनायके ऊर्फ 'एकेडी' यांच्यावर जनतेने विश्वास ठेवला याचे कारण राजकारणातील त्यांची डावी भूमिका. नागरिकांस 'व्यवस्था बदला'ची भाषा करणारे नेहमीच जवळचे वाटतात. कारण कोणत्याही व्यवस्थेत भले झालेल्यांपेक्षा असे काही न झालेल्यांची संख्या नेहमीच जास्त असते. त्यात श्रीलंका तर खरोखरच डबघाईला आलेली असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे भिक्षेचा कटोरा घेऊन जाण्याची वेळ त्या देशावर आलेली आहे. भारताने जे १९९१ साली अनुभवले ते श्रीलंकनांस आता प्रत्ययास येत आहे. उभय देशांतील फरक इतकाच की तेथे कोणी शहाणा नरसिंह राव नाही आणि त्यांना साथ देणारा मनमोहन सिंगही नाही. अशा राजकीय पोकळीत सामान्य माणसाचा राग हा सत्ताधीशांवर निघत असतो. आपल्या या कफल्लकावस्थेस आपले प्रस्थापित राजकारणी जबाबदार आहेत असे जनसामान्यांस वाटू लागते आणि ही व्यवस्था उलथून पाडण्याची भाषा करणारा आकर्षक वाटून त्याच्या हाती सत्ता द्यावी असे बहुसंख्यास वाटते. म्हणजे 'व्यवस्थेच्या विरोधात' बोलणारा विचाराने डावाच असायला हवा असे नाही. नागरिकांच्या या नाराजावस्थेत उजवाही डावा ठरतो. उदाहरणार्थ दहा वर्षांपूर्वी आपल्याकडे झालेला सत्ताबदल त्यासाठी अर्थव्यवस्था सुधारणे हे अगत्याचे. यात राजकीय विचारधारा उपयोगी पडत नाही. या आघाडीवर एकेडी यांस किती यश येते ते दिसेलच. तसेच भारत सरकारच्या खांद्यावरून श्रीलंकेत कंत्राटे मिळवणाऱ्या उद्योग समूहांचे आता काय होणार हेही पाहणे औत्सुक्याचे असेल. एकंदरीत उत्तरेच्या नेपाळपाठोपाठ आता दक्षिणेतील श्रीलंकेची ही 'वाम'पंथी वाटचाल आपल्यासाठीही महत्त्वाची असेल.

# विद्यार्थ्यांनो आवडीच्या क्षेत्रात करिअर करा

## राज्यपाल : एमआयटी एडीटी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ

अनिल चौधरी/ पुणे

विद्यार्थी हा उद्याच्या विकसित भारताचा प्रमुख कणा आहे. भारताच्या या युवा पिढीने कधीही हताश न होता, शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित राखून आपल्या आवडीच्या क्षेत्रात यशस्विरित्या करिअर करावे. विद्यार्थ्यांनो दुसऱ्याच्या यश-अपयशाचा विचार न करता, केवळ आपले काम, प्रतिभा व तत्वांवर ठाम राहून कष्ट केल्यास कुठल्याही क्षेत्रात यश नक्कीच मिळते, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी मांडले.

ते येथे आयोजित एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या ७व्या दिक्षांत समारंभा प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रतिष्ठित शास्त्रज्ञ इस्रो तथा यु.आर.राव उपकेंद्र, बंगळुरूचे संचालक डॉ. एम. शंकरन, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ. सुनिता कराड, सौ.ज्योती ढाकणे-कराड, डॉ.विनायक घैसास, डॉ.सुचित्रा नागरे, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.अनंत चक्रदेव, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, परीक्षा नियंत्रक डॉ.ज्ञानदेव नीलवर्ण आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन पुढे म्हणाले, अध्यात्माचा संबंध हा प्रत्येकाच्या जिवनाशी व जिवनातील प्रत्येक गोष्टीशी असतो. आर्थिक प्रगतीसाठी मानवाची सांस्कृतीक प्रगतीही तितकीच महत्त्वाची असते. असेच मुल्याधिष्ठीत व संस्कृतीची जाण असणारे विद्यार्थी घडविण्याचे काम एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या माध्यमातून घडत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधनाच्या माध्यमातूनच आपण गरिबी दूर करू शकतो आणि अशाच प्रकारच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे काम या विद्यापीठाकडून घडत आहे, असे म्हणत, राज्यपालांनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या पाठीवर कौतुकाची थापही टाकली.




### एकूण २९७२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विश्वशांती प्रार्थनेद्वारे सुरू झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठातील २२ पीएचडी, ५३ सुवर्णपदके व १९४ विद्यार्थ्यांना रँक होल्डर प्रमाणपत्र यांसह एकूण २९७२ विद्यार्थ्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पदवी बहाल करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थ्यांसह ८ हजारपेक्षा अधिक लोकांनी देशभरातून हजेरी लावली. तसेच यावेळी राजदंडासह काढण्यात आलेल्या आकर्षक मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पसायदानाने सांगता झालेल्या या कार्यक्रमाचे आभार डॉ.पुजेरी यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.स्नेहा वाघटकर व प्रा.स्वप्निल शिरसाठ यांनी केले.

### विद्यार्थ्याच्या यशात संस्थेचा वाटा महत्वाचा

एम.शंकरन म्हणाले, आपण कुठल्याही क्षेत्रात कमी नाही, हे भारताने नुकतेच जगाला दाखवून दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचा अभिमान आणि स्वाभिमान बाळगूण देशाचे नाव वाढविण्यासाठी प्रयत्नशिल राहिले पाहिजे. आपल्या देशात जगात कोणाकडेही नाही अशी प्रतिभावंत युवा पिढी आहे आणि याच युवा पिढीच्या खांद्यावर आता डॉ.कलाम यांनी दाखवलेल्या प्रगत देशाचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. विद्यार्थी केवळ स्वतः कष्टाने जीवनात यशस्वी होत नाही. तर त्याच्या यशामागे, संस्थेसह अनेकांचा हातभार लागलेला असतो. त्यामुळे आता पदवी घेवून समाजात प्रवेश करत असताना आपणही समाजाचे काहीतरी देणं लागतो, याचे कायम भान ठेवा, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना, प्रा.डॉ.मंगेश कराड यांनी विद्यापीठाने वर्षभरात केलेल्या उल्लेखनिय कामगिरीचा अहवाल मांडला. ते म्हणाले की, पदवी प्रदान सोहळा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्वाचा क्षण असतो. ज्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याचा शेवट व उज्वल भविष्याची सुरवात होत असते. अशात यंदाचा ७वा दीक्षांत समारंभ 'एमआयटी एडीटी'साठी विशेषार्थाने गौरवाचा दिवस आहे. 'एमआयटी एडीटी'ने ने परीक्षेसाठी संपूर्ण डिजीटल प्रणाली अवलंबली असून, त्यामुळे निर्विघ्न परिक्षेची अंमलबजावणी, वेळेत अचून निकाल व सर्व प्रक्रियेतील पारदर्शकता ही 'एमआयटी एडीटी'ची आता ओळख बनली आहे.

एमआयटी एडीटीने एक चांगला विद्यार्थी घडविण्यासोबतच एक मुल्याधिष्ठीत मनुष्य जो अध्यात्म व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशिल असतो, असे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. या दीक्षांत समारंभाच्या माध्यमातून आज पदवी मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीही भारताच्या उज्वल भविष्यात आपला अनमोल वाटा द्यावा, असे मी त्यांना आवाहन करतो.

–प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड,
संस्थापक अध्यक्ष,
माईर्स एमआयटी शिक्षण समुह,
भारत

# कबड्डी स्पर्धेत कौशल्या शाळेचे यश

## क्रीडा : पैठणमध्ये पावसाळी स्पर्धा



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित, कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेतील खेळाडूंनी तुकाराम हायस्कूल ढाकेफळ (तालुका पैठण) येथे संपन्न झालेल्या पावसाळी पैठण तालुका स्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत सालाबाद प्रमाणे याही वर्षी घवघवीत यश संपादन करून आपले यशाची परंपरा कायम ठेवली.यामध्ये १४ व १९ वर्षाखालील गटात मुलांनी प्रथम तर१९,१७ व १४ वर्षाखालील गटात मुलींनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत कबड्डी स्पर्धेतील आपल्या शाळेचा दबदबा कायम ठेवला.

या विजयी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब,सचिव श्री वाल्मिकरावजी सुरासे साहेब, उपाध्यक्ष विठ्ठलजी पैठणकर साहेब, कोषाध्यक्ष विशाल सुरासे सर तालुका क्रीडा अधिकारी गीता साखरे मॅडम, तालुका क्रीडा मार्गदर्शक डॉ सोमनाथ टाक, लक्ष्मण सपकाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड सर मुख्याध्यापक आप्पासाहेब रणशूर, क्रीडा शिक्षक बालाजी नलभे स्वप्नील गव्हाणे, गणेश भाकरे,मच्छिंद्र नागे,रमेश गोरे,कैलास वाघमारे, सुनील गोरे,सुदाम पवार, जालिंदर सव्वाशे, चंद्रकांत काळे, ताठे सर सहशिक्षक नंदकिशोर पातकळ, स्वप्नजा पाटील, विजय सपकाळ, सोन्याबापु पालवे, नारायण औटे, भाऊसाहेब गायकवाड, अमोल गायकवाड, प्रकाश कामडी, आकेश दांडेकर, प्रविण काळे, अनिता गायकवाड शितल थिटे, अस्मिता भिसे, अक्षय शेळके,निखिल पापुलवार, सतिष पवार, विठ्ठल त्रिभुवन, महेश गायकवाड यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पान एक वरून

**जरांगे पाटलांची**

पाटील यांच्या उपोषणाचा आठवा दिवस आहे. आज पुन्हा मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली असल्याचे पाहायला मिळत आहे. काल मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळी छत्रपती संभाजी राजे दाखल होत त्यांनी त्यांची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी आपली भूमिका देखील मांडली होती. मात्र आज उपोषणाच्या आठव्या दिवशी मनोज जरांगे पाटील त्यांची प्रकृती चांगलीच खालवल्याने ग्रामस्थ आणि नागरिकांमध्ये चलबिचल सुरू झाली आहे. महिलांनी देखील मनोज जरांगे पाटील यांना पाणी पिण्यासाठी विनवण्या केल्या मात्र मनोज जरांगे यांनी महिलांना देखील नकार दिला आणि महिलांना देखील अश्रू अनावर झालेत. महिलांनी त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. पण जरांगे पाटील त्यांच्या मागणीवर ठाम आहेत.

**राजेभाऊ फड यांचा राष्ट्रवादी**

म्हणजे गेल्या दहा वर्षापासून मुलीच्या लग्नासाठी मोठी आर्थिक मदत असते आगामी विधानसभेच्या निवडणुकीत विद्यमान कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना तडीस तोड उत्तर देण्याची ताकद आहे. राजेभाऊ फड यांचा प्रवेश होणार असल्यामुळे मतदार संघात राष्ट्रवादीमय वार्तावरण निर्माण होत आहे. मुंबई येथे होणाऱ्या प्रवेशासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री आ.जयंत पाटील महीला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री फौजिया खान, खासदार सुप्रिया सुळे माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड आमदार रोहित पवार खासदार बजरंग सोनवणे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या सह आदींची उपस्थिती लाभणार आहे.

**पुल कामामुळे घडू शकतात**

करण्या पुर्वी वळण मार्गाची सर्व झाडे झुडपे काढून रस्ता मोकळा करायला पाहिजे होता . रस्ता बाजूने खोदायला पाहिजे होता .जेणे करुन वाहनास अडचण निर्माण झाली नसती,आता येथून जिव मुठीत धरून जावे लागत आहे. काल तर हद्दच झाली , पावसाचे पाणी काढायचे म्हणून सगळाच रस्ता खोदला या मुळे अर्धा तास ह्या महामार्गावरची वाहतूक खोळंबली होती . खोदकाम जवळ येई पर्यंत दिसत नाही : रस्ता वळणाचा व उताराचा आहे आणि झाडा झुडूपाने विळख्यात सापडलेला आहे . पुलाचे काम मध्य भागी आहे . तेलगाव कडून आलेल्या वाहनाला जवळ येईपर्यंत खोदकाम दिसत नाही आणि सिरसाळ्या कडून जाणा-यांना सुद्धा जवळ जाईपर्यंत खोदकाम दिसत नाही . हे असेच राहिले तर या ठिकाणी भयानक अपघाताचे तांडव घडू शकतात , संबंधित गुत्तेदाराने तात्काळ या गांभीर्याने या ठिकाणी लक्ष द्यायला पाहिजे अशी मागणी नागरिक करीत आहेत.

**परळी विधानसभा मतदार**

२०१९ मध्ये धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांचा पराभव केला होता. लोकसभा निवडणुकीत महायुतीकडून भाजपने पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिल्याने त्यांच्या विजयासाठी धनंजय मुंडे यांनीही अटोकाट प्रयत्न केले. परळीतून पंकजा मुंडे यांना जवळपास ७४ हजारांचे मताधिक्यही मिळवून देत भाऊ या नात्याने प्रचाराचे पालकतत्त्वही स्वीकारले होते. मात्र, पंकजा यांचा साडे सहा हजार मताने पराभव झाला. विधानसभा निवडणुकीत परळीची जागा अजित पवार गटाला सुटून धनंजय मुंडे हे मैदानात असतील तेव्हा भाजपचा येथून उमेदवार नसेल. चाळीस वर्षांमध्ये प्रथमच परळीत कमळ चिन्हाचा उमेदवार नसेल. पंकजा मुंडे यांना विधान परिषदेवर संधी मिळाल्याने आणि राज्यातही महायुतीत अजित पवार यांची राष्ट्रवादी व भाजप सत्तेत असल्याने धनंजय मुंडेंसमोर सक्षम उमेदवार कोण, हे नाव समोर येत नाही. मात्र, स्थानिक पातळीवरील नाराजी, एकगठ्ठा मतदान होणारे भाग, शरद पवार यांची भूमिका, या पातळीवरील विचारांती परळीत काही नेत्यांनी राजकीय विरोधकांच्या एकीकरणाची आघाडी उघडण्याचा प्रयोग मोर्चाच्या माध्यमातून करून पाहिला आहे.

**अक्षय शिंदेचा मृत्यू**

शोषण प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला सोमवारी नवी मुंबईच्या तळोजा कारागृहातून महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूरला नेत असताना पोलिसांनी चकमकीत ठार केलं. अति रक्तस्रावामुळे अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्याचं रुग्णालयातील सूत्रांनी सांगितलं. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात अक्षयच्या डोक्यात गोळी लागल्याचं स्पष्ट झालं आहे. गोळी लागल्यानं अति रक्तस्राव झाल्यामुळे अक्षय शिंदेचा तात्काळ मृत्यू झाल्याचं अहवालातून समोर आलं आहे.

**म्हणून आमच्या भावना**

करण्यात आला आहे.तरी नंदकिशोर मुंदडा यांचा फोटो महापुरुषांच्या लढाईमध्ये लावण्यात आला होता तरी नंदकिशोर मुंदडा तुम्ही चिंध्या गोळा करून व मतदार संघ लुटुन महापुरुष झाले का असा प्रश्न नागरिकांना उपस्थित होत आहे नागरिकांन मध्ये भावना व्यक्त करण्यात येत आहे.चौकट:- मुंदडा कुटुंबातील कोनत्या व्यक्तीची महापुरुषांमध्ये बसण्या एवढी लायकी आहे,एक चिंध्या गोळा करणारा दुसरा बायकोचा बैल व बायको मुंबईच पार्सल असा मुंदडा परीवार आहे आणी महापुरुषांच्या फोटो सोबत फोटो लावायला लाज वाटत नाही का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

**बदलापूर लैंगिक अत्याचाराचे**

यावेळी व्यक्त केली.दरम्यान, संबंधित शाळेचे अध्यक्ष आणि सचिव यांनी अटकपूर्व जामिनासाठी सोमवारी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, अटकेपासून दिलासा देण्याची मागणी केली. न्यायालयाने मात्र त्यांना कोणताही तातडीचा दिलासा देण्यास नकार दिला व त्यांच्या याचिकेवरील सुनावणी १ ऑक्टोबर रोजी ठेवली.

**दिल्लीत उभं राहिलं संघाचं**

ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी जो ऑनलाईन अर्ज करण्यात आला होता त्यात बांधकामाचा तेव्हापर्यंतचा तपशी, इमारतीचं स्केच, फोटो, सद्यस्थितीतले फोटो हे सगळंही पाठवण्यात आलं होतं. या प्रकल्पाला सीसी म्हणजेच कम्प्लिशन सर्टिफिकेट मिळण्याआधी एनओसीची गरज असते. ते देण्यात आलं आहे. दिल्लीतल्या केशवकुंज या ठिकाणी ही इमारत उभारण्यात आली आहे.

# पान सहा वरून

**केजमध्ये संगीता ठोंबरे**

केज मधील सांस्कृतिक सभागृह सुद्धा ठोंबरे यांनी मंजूर करून आणलेले आहे पक्षाने मा.आ.संगीता ठोंबरे केज विधानसभा सभेची उमेदवारी दिली तर पुर्ण ताकदीने केज विधानसभेची निवडणूक लढणार असल्याची माहिती मिळत आहे सध्या तरी विद्यमान आमदाराचा तगडा विरोधक म्हणून माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्याकडे पाहिले जात आहे.

**मुले पळवणारी टोळी**

चारही बाजूने घेराव घालून त्या इस्मचा शोध घेतला मात्र तो ही पळुन जाण्यास यशस्वी झाला घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दिगंबर सोनटक्के यांनी घटनास्थळी धाव घेतली पालकांनी स्वतः हुन आपल्या मुलांची काळजी घ्यावी मुलें पळवणारी टोळी तर सक्रिय झाली नाही ना अशी चर्चा परिसरात होत आहे

**आरक्षण हक्क परिषदेस**

सोमनाथ चांदमारे , अंजेराम घनघाव , पंडित ओव्हाळ , राजेश घोडे , आशोक डोणे , शेख मजहर , अशोक मगर यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच सुप्रसिद्ध शाहिर दत्ता शिंदे , शा. दत्ता पाईकराव , शा. सुरेश रंझवे , शा. स्वितम इंगळे , शा. सुमित साळवे , शा. युवराज ढगे , शा. सौरभ सिरसाठ आदि शाहीरांच्या भिमगितांचा जलसा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे आयोजन वशिष्ठ लांडगे , वैजनाथ गडसिंग , राजकुमार मोरे , विशाल ससाने , धम्मानंद गावडे , सय्यद अन्वर , गंगाधर सोनपसारे , भास्कर पौळ , शेख अर्शद , विश्वनाथ तोडके , साहेबा टाकणखार , आनंद साळवे , कच्छिंद्र कांबळे , विलास खळगे , विशाल साळवे यांनी केले आहे तरी माजलगाव तालुक्यासह बीड जिल्ह्यातील तमाम संविधान प्रेमी जनतेने या ऐतिहासिक आरक्षण हक्क परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानि नेते विजय साळवे यांनी केले आहे.

**संभाजीनगरमध्ये पेन्शन**

छावणी छत्रपती संभाजीनगर पर्यंत जाण्या-येण्याकरिता सैनिकी परिवहनाची तसेच चहा पान व दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे तरी सर्व माजी सैनिकांनी व कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन ब्रिगेड कमांडर ९७ ब्रिगेड व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

**बदलापूर एन्काऊंटर करून**

होता. त्याच्या माध्यमातून त्या संस्थेतील अजून घटना समोर आल्या असत्या की, अजून किती चिमुरड्यांवर अत्याचार होत आहे. पण याबाबत चौकशी होण्याआधीच त्याला संपविण्यात आले आणि तो प्रश्न तिथेच थांबला. त्याचबरोबर शाळेतील सीसीटीव्ही फुटेज गायब झाल्याचे त्यांनी नमूद केले.या प्रकरणाशी संबंधित घटना अतिशय क्लेशदायक आहेत. कालची घटना ही इथली सवय होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. पोलिसांनी त्यांचे काम चोख पद्धतीने केले पाहिजे. ज्यांच्यावर गोळीबार झाला त्या पोलीस कर्मचारी यांचा रिपोर्ट हा सर्वांच्या समोर आला पाहिजे. जेणेकरून कालची घटना ही चुकीच्या मार्गाने किंवा चुकीच्या माणसांच्या संरक्षणासाठी झाली का हे जनतेसमोर आले पाहिजे, असे रूपवते यांनी म्हटले आहे.

**चळवळीतले अभ्यासू**

परिवार आहे.दरम्यान प्रा. वसंत कांबळे यांच्यावर अंदाजे सायंकाळी ४ च्या सुमारास भीम नगर येथील शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील असे समजते.

**राज्यात प्रथमच बाल**

शिल्पकला यातील कोणतीही कला हे विशेष मुले करू शकतात. महोत्सवाच्या ठिकाणी या मुलांनी बनवलेल्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीसाठी ठेवता येणार आहे. महाराष्ट्रात बीड जिल्ह्यातून या महोत्सवाला सुरूवात होत असून जास्तीत जास्त संख्येने दिव्यांग शाळा, विद्यालये, संस्था, शिक्षक, विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के सामंत, उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, शैलेश गोजमगुंडे, प्रमुख कार्यवाह सतिश लोटके, राजू तुलालवार, दिपक रेंगे, दिपाली शेळके, आसेफ अन्सारी यांच्यासह सर्व कार्यकारिणी मंडळ, यहा के हम सिकंदर दिव्यांग महोत्सव समितीचे धनंजय जोशी, नंदकिशोर जुवेकर, दिपाली शेळके, नागसेन पेंढारकर बीड शाखेचे डॉ.संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, शाहीर विलास सोनवणे, अनुराधा चिंचोलकर, प्रा.दुष्यंता रामटेके आदींनी केले आहे.

**परशुराम आर्थिक विकास**

मुंडे यांची भेट घेऊन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने आभार मानले.यावेळी ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव धर्माधिकारी,परशुराम सेवा संघाचे अध्यक्ष विश्वजीत देशपांडे, ब्राह्मण समाजाचे नेते काकासाहेब कुलकर्णी, भाजप महिला आघाडी प्रदेश प्रकोष्ट डॉ. संजीवनीताई पांडे, शशिकांत बिराजदार, श्रीपाद पाठक आदी उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com


Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com


# केजमध्ये पथदिवे लावा?

## बोंबला केज संघर्ष समितीलाही ठेवले अंधारात?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

एचपीएम कंपनीकडून नगरपंचायत कडे केजच्या मुख्य रस्त्यावरचे पथदिवे केज नगरपंचायत कडे दोन वर्षांपासून हस्तांतरीत झाले आहेत पण ते चालु करण्या साठी अश्वासनाच्या खैरती शिवाय केजकरांच्या हाथी काही लागले नाही.गेल्या अडीच वर्षांपासून विकासाच्या नावाने शिमगा आहे पण सत्ताधारी न झालेला किंवा कोठे तरी वार्डात फूटभर झालेल्या विकासावरच आपले घोडे न्हाऊन काढत असतात बडे बडे बाता विकास मात्र शुन्य युव करूगां..तिव करूगां याच्या पुढे विकास काही गेला नाही.सगळा विकास नगरोत्थान योजनेंतर्गत झालेल्या व नगरपंचायतने दिलेल्या नाहरकत माणपत्रा शिवाय काही नाही. ३ कोटी ५० लाखाचा दलित निधी अन्यत्र वळवळवल त्या साठी उद्या दिनांक २४ सप्टेंबर पासुन दलित युवकांचे उपोषण आहे.फुलेनगर मधील जिथे दलित वस्ती नाही तिथे रोड नाली बनवली तेही आपल्या सगे सोयरा च्या प्लांटीग साठी.गेल्या आठवडय़ात केज संघर्ष समितीने सणासुदीचा





काळ आहे,गणपती,नवरात्र असे सण असल्या कारणाने केज शहरातील पथदिवे चालू करावेत या साठी अंदोलन पुकारले होते या अगोदर सुद्धा अंदोलन पूकारले पण अश्वासनावर नगरपंचायतने बोळवण केली होती.पण या वेळेस डिपी उभारून सर्व मान्यवर व केज संघर्ष समितीचे हनुमंत भोसले यांना सोबत घेऊन पथदिव्याचे उद्घाटन केले पण दुपारी उद्घाटन केले आणि रात्री पथदिवे बंदच राहीले ते अजतागायत बंद आहे.उद्घाटनाच्या दिवशी त्याच राणाभीमदेयी घोषणा, पत्रकार, अंदोलन करते समाज सेवक यांना टुमने पर भाषणे आणि संध्याकाळी नगराध्यक्ष व सर्वेसर्वा यांचे पोकळ विकास केज शहरातील नागरिका समोर. केजच्या नगराध्यक्ष व त्यांचे पक्षाचे सर्वेसर्वा केज मतरसंघातून आमदारकीचे स्वप्न पडत आहेत त्याना अडीच वर्षांत केजचा विकास करता आला नाही, सकाळी उद्घाटन केलेले पथदिवे रात्री चालू होत नसतील शहरातील जनतेला अंधारात चाचपडत लागावे लागत असेल तर याला काय म्हणायचे.म्हणून केजची जनता म्हणते आगोदर केजचे पथदिवे लावा त्यानंतर केज मतरसंघात दिवे लावा.आता या नंतर केज संघर्ष समितीच्या हनुमंत भोसले यांनी मागे घेतलेल्या अंदोलन व न लागलेले पथदिवे याच्या वर पुढे काय भुमिका घेतात यावर केज च्या जनतेची नजर आहे.

# कर्मचाऱ्यांचा वेतन प्रश्न मार्गी लावण्यात अडचण

## धोरण: सरपंच अन्वर पट्टेदार यांची माहिती

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी



ग्रामपंचायतीचे कार्य सुरळीत करण्याची प्रबळ इच्छा असतांना देखील ग्रामसेवकांची अनुपस्थिती आणि विरोधी सदस्यांची विरोधी भूमीका या मुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकीत व चालू वेतन देण्यात अडचण निर्माण होत आहे , असहकार होत असल्याने कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन प्रश्न प्रलंबित राहत आहे. ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक ३० सप्टेंबर रोजी थकीत वेतना साठी काम बंद अंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे . हा प्रश्न मार्गी लावण्याचा कसोशीने प्रयत्न सरपंच अन्वर पट्टेदार यांच्या कडून होत आहे . परंतु ग्रामसेवक/सदस्यांच्या विरोधी भूमीके मुळे यास अडचण ठरत आहे . काही दिवसापुर्वी शिंदे नामक ग्रामसेवक या ठिकाणी नियुक्त करण्यात आले होते परंतु ते हजर झाले नाही. १ सप्टेंबर पासुन ग्रामसेवक शेख आले परंतु ते पुन्हा व दिनांक ४ सप्टेंबर रोजीच्या ग्रामसभेस उपस्थित नाहीत.अंबाजोगाई पीपल्स बँके कडे १० लक्ष रुपयांच्या कर्जाची मागणी आहे,बँक अधिकारी ठराव मागत आहेत, ग्रामसेवकांची अनुपस्थिती आणि विरोधी सदस्य ठराव अमान्य करत आहेत. ह्या कर्ज रकमेतून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा काही प्रमाणात थकीत वेतन प्रश्न मार्गी लावता येईल यासाठी बँकेकडे कर्ज मागणी केली आहे . परंतु ठराव सदस्यांकडून अमान्य झाल्याने यात अडचण निर्माण झाली . ग्रामपंचायत चे असाणारे व्यावसायिक १० गाळे धारकांकडे थकीत भाडे ३/४ लक्ष रुपये आहे.यांना नोटीस जारी केली पंरतु सदरील व्यावसायिकांनी अद्याप गाळे भाडे दिले नाही .अशी माहिती सरपंच अन्वर पट्टेदार यांनी व्यक्त केली आहे . ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याची प्रमाणित प्रयत्न केला जात आहे असेही पट्टेदार यांनी म्हटले आहे .

# संगम शालेय व्यवस्थापन समितीची निवड



तेलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथून जवळ असलेल्या संगम तालुका धारूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीच्या अटीतटीत झालेल्या निवडणुकीत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब भाग्यवंत यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी बंडू आरसूळ यांची निवड झाली. आजपर्यंत कधीही इथल्या शालेय व्यवस्थेतून समितीची निवडणूक कधीही अटीतटीची झाली नव्हती यावर्षी प्रथमच या निवडणुकीत दोन गटात मोठी चुरस निर्माण झाले होते दोन गटात झालेल्या या निवडणुकीत अध्यक्ष पदी बाबासाहेब भाग्यवंत तर उपाध्यक्षपदी बंडू आरसूळ यांची नियुक्ती झाली तर सदस्य पदी रंजना हर्षदा साळवे , सुनीता अशोक सौंदडे,महादेव अर्सुळ,यांची निवड करण्यात आली.भीम आर्मी या सामाजिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सिध्दार्थ मायन दळे, यांच्या कुशल नेतृत्वात झालेल्या या निवडणुकीत प्रथमच मोठ्या निवडणूकी सारखे स्वरूप आले होते.सर्व विजयी पदाधिकारी यांचं सर्वस्तरातू अभिनंदन होत आहे.

# ...तर एकरी शंभर टन ऊस उत्पादन

## सुरेश माने:माजलगाव पंचायत समितीत कार्यक्रम

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

योग्य निचऱ्याची जमीन, शाश्वत पाणी , बारा महिने सूर्यप्रकाश आणि मेहनती शेतकऱ्याने योग्य नियोजन केल्यास एकरी शंभर टन उस उत्पादन घेणे शक्य आसे प्रतिपादन श्री सुरेश माने पाटील माजी शास्त्रज्ञ वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे यांनी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा अंतर्गत तालूका कृषी अधिकारी माजलगाव कार्यालय यानी पंचायत समिती सभाग्रह येथे काल मंगळवारी आयोजित किलेल्या शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात केले पुढे बोलतांना माने म्हणाले की , जामिनीची पुर्व मशागत ,सरितील अंतर ५ फुटापेक्षा जास्त ,ठिबक सिंचनाचा योग्य वापर माती परीक्षणावर आधारीत रासायनिक खताचा वापर आणी मातीआड करून देणे ,सेंद्रीय आणी जिवाणू खाताचा वापार, फुटवा





व्यवस्थापण, ऊस बेणे प्रक्रिय या बाबीच योग्य अवलंब केल्यास ऊसा मध्य एकरी शंभर टन उत्पादण घेणे शक्य आहे म्हणत शेतकऱ्यांनि जमिनीची निचरा पद्धत वापरणे खूप महत्वाचे असल्याचे सांगत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री एस. एस .संगेकर तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.डोंगरे सहाक गट विकास माजलगाव पंचायत समिती माजलगाव उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून श्री सुरज पाटील प्रकल्प उपसंचालक आत्मा बीड,श्री सिद्धेश्वर हजारे कृषी अधिकारी पंचायत समिती , शेजुळ पशुधन विकास अधिकारी,श्री ड डी वाघमोडेमंडळ कृषी अधिकारी केसापुरीआणि कृषी विभागातील कृषी सहाय्य कृषी सहाय्यक ,कृषी प्रवेशक,आत्मा कर्मचारी आणि तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले,आभार प्रदर्शन श्री गौरव बापमारे कृषी पर्यवेक्षक माजलगाव यांनी माणले

# रेल्वे मार्गाच्या अडचणींसंदर्भात बैठक

## संदिप क्षीरसागर:कार्यवाही करण्याच्या सूचना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड मतदारसंघातुन जाणाऱ्या रेल्वे मार्गावर नागरिकांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. रेल्वे मार्गाच्या कामात अनेक त्रुटी असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच काही ठिकाणी अपघात होत आहेत. या भागातील नागरिकांनी यासंदर्भात अनेकवेळा रेल्वे विभागाशी अनेकवेळा संपर्क केला आहे. परंतु रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद नागरिकांना मिळाला नाही. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवार (दि.२३) रोजी रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्यक्ष, सविस्तर चर्चा करून तक्रारी असलेल्या ठिकाणांची तात्काळ पाहणी करून येथील अडचणी दूर करण्यासंदर्भात सत्वर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

बीड मतदारसंघातून नगर–बीड–परळी रेल्वे मार्ग मोठ्या प्रमाणात गेलेला आहे. याचे कामही मोठ्या प्रमाणावर झाले आहे. परंतु या कामांमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे या भागातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे पुलांच्या खाली पावसामुळे नेहमीच खूप जास्त पाणी साचून राहते. त्यामुळे येथून वाहतूक करणे अवघड होते. ऊस वाहतूक करणारी वाहने याठिकाणाहून जाऊ शकत नाही. वाहतुकीची अडचण होत असल्याने या परिसरात रहिवाशी असलेले १५ ते २० हजार लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी रोड तिरका झाल्याने अपघात होत आहेत. या होत असलेल्या अडचणींमुळे येथील नागरिकांनी आतापर्यंत रेल्वे विभागाकडे अनेकवेळा संपर्क केला. परंतु नागरिकांना याबाबत रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२३) शासकीय विश्रामगृह, बीड येथे रेल्वे विभागाचे संबंधित अधिकारी यांची बैठक घेतली. यावेळी रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अडचणी संदर्भात अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून अडचणी दूर करण्यासाठी संबंधित ठिकाणच्या प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासकीय स्तरावर तात्काळ कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, रेल्वे विभागाचे सर्व संबंधित अधिकारी व या भागातील नागरिक उपस्थित होते.

# चिठ्ठी टाकून निवडला मुख्यमंत्री योजना दूत

## बोंबला:निंबायती ग्रामपंचायत येथील प्रकार

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री योजना दूत निवडीसाठीही चक्क ईश्वर चिठ्ठी काढून मुख्यमंत्री योजना दूत निवडण्याची प्रक्रिया मंगळवारी सोयगाव तालुक्यातील निंबायती ग्रामपंचायत येथे ग्रामविकास अधिकारी सुनील राकडे यांच्या हस्ते पार पडली या निवड प्रक्रियेत प्रवीण चव्हाण यांच्या नावाची ईश्वर चिठ्ठी निघाल्याने त्यांची निंबा यती गावाच्या योजना दूत म्हणून निवड जाहीर झाली आहे त्यामुळे निवडीची पारदर्शकता समोर आली आहे

शासनाने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजने अंतर्गत गावपातळीवर शासनाच्या विविध योजना राबवून जनजागृती साठी मुख्यमंत्री योजना दूत सुरू केली आहे ग्रामपंचायत स्तरावर एक याप्रमाणे तालुक्यातील ४६ ग्रामपंचायत साठी ४६ ,जागा होत्या त्यासाठी १३ सप्टेंबर पर्यंत



ऑनलाइन पोर्टल वर अर्ज करण्यासाठी मुदत होती परंतु निंबायती ग्रामपंचायत साठी पोर्टलवर दोघांचे अर्ज प्राप्त होऊन दोघेही योजना दूत साठी प्राप्त झाले होते त्यामुळे निंबायती ग्रामपंचायतने ईश्वर चिठ्ठी काढण्याचा निर्णय घेऊन दोन्ही पात्र प्रवीण चव्हाण आणि पंकज गोसावी यांच्या नावाच्या चिठ्ठ्या डब्यात टाकून करिष्मा राठोड या दहा वर्षीय मुलीने एकच चिठ्ठी काढून प्रवीण चव्हाण यांची निवड करण्यात आली दरम्यान यावेळी राजू पाटील, धनसिंग राठोड, विशाल गोसावी, बबलू राठोड, मूलचंद राठोड, नारायण प्रभाकर, नारायण राठोड,विश्वनाथ जाधव, मखराम राठोड, भागचंद चव्हाण, सुनील राठोड आदींची उपस्थिती होती प्रक्रियेत ग्रामविकास अधिकारी सुनील राकडे,कर्मचारी राजेंद्र राठोड, योगेश चव्हाण सुनील राठोड चंदू राठोड आदींनी पुढाकार घेतला होता..

# ऑल इंडिया पँथर सेनेची बैठक



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

ऑल इंडिया पँथर सेनेच्या केज तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी संदर्भात कार्यकर्ता बैठक घेण्यात आली. याबाबत सविस्तर बातमी अशी की, ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या आदेशावरून केज तालुक्यात संघटना बळकट करण्याचे काम सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून रविवार, दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी शासकीय विश्रामगृह, केज येथे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जीवन गायकवाड, मराठवाडा युवक अध्यक्ष अक्षय भुंबे, जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना मौलिक मार्गदर्शन केले. राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाई केदार दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी केज शहरात येत असून ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष समाधान बचुटे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांचे हस्ते ठेवण्यात आले आहे. तसेच केज तालुका संवाद मेळावा व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व सन्मान दिपक भाई केदार यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे तालुकाध्यक्ष समाधान बचुटे यांनी म्हटले आहे.

## आ.प्रकाश सोळंके राज्यस्तरीय वाद विवाद स्पर्धा उत्साहात

# नवीन धोरण ठरवताना चर्चा महत्वाची

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संभाजीनगर सह अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त नवीन शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल का/ नाही या विषयावर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके होते.तर स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे,प्रा.बालाजी बोडके,प्रशांत चव्हाण, सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. प्रकाश सोळंके





म्हणाले की, एखादे नविन धोरण ठरवत असताना त्याविषयी समाजात चर्चा घडवून आणणे हे महत्त्वाचे आहे.त्या दृष्टिकोनातून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय धोरणाविषयी स्पर्धेच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली जात आहे हे स्तुत्य आहे .राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर सह अन्य जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये माणिकचंद पहाडी विधी महाविद्यालय संभाजीनगर (प्रथम), श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव( द्वितीय), तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर (तृतीय ) या महाविद्यालयाने पारितोषिक पटकावले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ.रामहरी मायकर, डॉ.रिंगणे, प्रा. भरत खेत्री यांनी केले. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. जी.के. सानप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. बालाजी बोडके यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ ज्ञानेश्वर शिंदे,प्रा.डॉ. गणेश मोकासरे,प्रा. डॉ.अरुण पेंटावार,प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. प्रकाश शिंदे, प्रा.सिद्धेश्वर कदम यांनी परिश्रम घेतले.

# पोस्टर पेंटिंग स्पर्धेत पटकावला क्रमांक!

## स्पर्धा: तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे यश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई आयोजित युवा महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीडच्या विद्यार्थिनीने भरारी घेत पोस्टर पेंटिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला आहे. याबद्दल देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप.रोडे यांनी विजेता विद्यार्थिनी पूनम पातरा हिचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.





मुंबई येथील शहा महाविद्यालय माटुंगा येथे दि.२१ स्पटेंबर रोजी एस.एन. डी.टी.महिला युवा महोत्सव पार पडला. या युवा महोत्सवात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फॅशन डिझाईन कॉलेजच्या विद्यार्थिनीने सहभाग नोंदविला होता. यामध्ये युवा महोत्सवात डान्स स्पर्धा, पोस्टर पेंटिंग स्पर्धा, निबंध स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा आदींचा समावेश होता. यातील पोस्टर पेंटिंग स्पर्धे त तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील बी.डिझाईन द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी पुनम बातरा हिने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. या राज्यस्तरीय युवा महोत्सवा मध्ये तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या विद्यार्थिनी यांनी त्रिपुरा राज्यातील होजागिरी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. याला प्रेक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी विद्यार्थिनींना तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड चे प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच पोस्टर पेंटिंग स्पर्धेसाठी प्रा.सुप्रिया ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा.सलोनी शेटे, प्रा.रंजना जोगदंड, भाग्यविधाता साळवे यांची मोलाची साथ मिळाली. पोस्टर पेंटिंग स्पर्धेतील विजेता विद्यार्थिनी पूनम बातरा हीचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.अशोक धुलधूले तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका यांनी अभिनंदन करून तिला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**सुविचार -** एखाद्याला हरवणे खूप सोप्पे आहे, पण त्याला जिंकणे खूप अवघड असते.

# जड झाले ओझे......!

एखाद्या मुख्यमंत्र्याची पुढची पिढी इतकी बेताल कशी असू शकते, असा प्रश्न उपस्थित करीत शरद पवारांनी भाजप नेतृत्वाने नीतेश राणे यांच्या वाचाळपणाला वेळीच आवर घालायला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नीतेश राणे अलीकडील काळात हिंदुत्वाच्या मुद्यावर बरेच आक्रमक झालेले दिसतात. त्यांची काही विधाने तर अतिशय वादग्रस्त ठरली आहेत. उघड उघड चिथावणीखोर भाषणामुळे त्यांच्यावर अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अर्थात त्यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास 'त्यांचा बाप सागर बंगल्यावर बसला आहे', त्यामुळे सध्यातरी त्यांना काळजी करण्याचे कारण नाही. खरे तर भाजप काय किंवा संघ परिवार काय, नेहमीच हिंदुत्ववादी राहत आले आहेत; परंतु त्यांच्या हिंदुत्ववादाला कुठे तरी एक मर्यादेची चौकट जाणवते. लोकसंख्येच्या प्रमाणात साधारण वीस टक्के असणारे मुस्लीम या देशाचे सन्माननीय नागरिक आहेत आणि त्यांना वगळून देशाचा विचार करता येणार नाही या वस्तुस्थितीची जाणीव परिवारातील आणि भाजपमधील सुज्ञ नेत्यांना नक्कीच आहे. या पृष्ठभूमीवर नीतेश राणे यांची आक्रमक भूमिका आणि सातत्याने ते वापरत असलेली चिथावणीखोर भाषा कोणत्याही भाजप नेत्याला अद्यापही आक्षेपार्ह वाटत नसेल तर यामागे काही वेगळे राजकारण तर नाही, अशी शंका घेण्यास नक्कीच वाव आहे. नीतेश राणे आणि त्यांच्या सारख्या दुसऱ्या - तिसऱ्या फळीतील नेत्यांच्या अशा चिथावणीखोर भाषणातून किंवा वक्तव्यातून भाजपचे फारसे नुकसान होण्याची शक्यता नाही. उलट झाला तर थोडा फार फायदाच होईल, तेच भाजप सोबत असलेल्या शिंदे सेनेच्या बाबतीतही म्हणता येईल. शिंदेसेनादेखील अशाच वैचारिक बाळकडूवर पोसल्या गेली आहे. या अशा सातत्याने होत असलेल्या वक्तव्यांमुळे, प्रचारामुळे अडचण होत आहे ती महायुतीतील तिसरा घटक पक्ष असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची. राष्ट्रवादी काँग्रेसची जी काही मतपेढी आहे त्यात मोठा वाटा अल्पसंख्याक समाजाचा आहे. तसेही अजित पवारांनी भाजप सोबत युती केल्यामुळे हा समाज त्यांच्यावर नाराज आहेच. लोकसभा निवडणुकीतही याचे प्रत्यंतर आले. भाजपच्या दुसऱ्या-तिसऱ्या फळीतील नेत्यांनी अशीच आक्रमक आणि चिथावणीखोर भाषा कायम ठेवली तर उरलासुरला अल्पसंख्याक समाजही महाविकास आघाडीकडे वळेल आणि आपल्या उमेदवारांना निवडून येण्यासाठी भाजप - शिंदेसेनेच्या दारासमोर उभे राहावे लागेल, या संभाव्य धास्तीपोटीच अजित पवारांनी राणे यांच्याविरोधात भाजपच्या पक्षश्रेष्ठींकडे तक्रार केली. अर्थात असे त्यांचे म्हणणे आहे. भाजपमधून अजून कोणी याला दुजोरा दिलेला नाही. अजितदादांच्या तक्रारीला भाजप श्रेष्ठींनी कितपत प्रतिसाद दिला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. युतीत सहभागी असलो तरी शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा आम्ही सोडलेली नाही, असे अजित पवार सतत सांगत असतात. केवळ विकासाच्या मुद्यावर आपण महायुतीत सामील झालो, असा त्यांचा दावा आहे. त्यांची ही वक्तव्ये महायुतीत त्यांची जी काही राजकीय घुसमट होत आहे, त्याचे निदर्शक म्हणावे लागतील. त्याचवेळी महायुतीचा कर्ताकरविता असलेल्या भाजपलादेखील अजितदादा आता ओझे वाटू लागले आहे. लोकसभा निवडणुकीत आपला लाभ आणि विरोधकांचे मोठे नुकसान होईल या आशेने भाजपने अजितदादांना आपल्याकडे खेचले, पण त्याचा अपेक्षित फायदा झाला नाही. उलट नुकसानच अधिक झाले. भाजपचे फोडाफोडीचे राजकारण मतदारांना अजिबात आवडले नाही. लोकसभा निवडणुकीत त्यामुळेदेखील भाजपला मोठा फटका बसला. शिवाय संघाच्या धुरिणांनाही भाजपचे हे राजकारण पटले नाही. शिवाय नाही म्हटले तरी राष्ट्रवादी काँग्रेस सोबत असल्यामुळे भाजपच्या आक्रमक हिंदुत्वाला बाधा येत आहे आणि अडचण ही आहे की भाजपकडे ध्रुवीकरणाच्या राजकारणाशिवाय सध्या तरी दुसरा पर्याय नाही. जातीच्या राजकारणातून उभे झालेले आव्हान पेलायचे असेल तर भाजपला हिंदुत्वाचा व्यापक पट उलगडावा लागेल. नीतेश राणेंची आक्रमक भूमिका, त्याला भाजप श्रेष्ठींची मूक संमती, पंतप्रधानांनी वर्धेत कर्नाटकातील वादग्रस्त घटनेचा दिलेला दाखला, सुरुवातीला जागावाटप मित्रपक्षांचा सन्मान राखून होईल, असे म्हणणाऱ्या भाजपने आता थेट १७० जागा लढविण्याची तयारी करणे, या सगळ्यांचा लसावी काढायचा झाला तर भाजप आणि शिंदे सेनेला अजित पवारांचे ओझे जड झाले, असाच निघतो. अर्थात त्यांना बाहेर पडा असे थेट सांगण्याचे धाडस फडणवीस आणि कंपनीकडे नाही. त्यामुळे ते स्वतःच बाहेर पडतील अशी परिस्थिती जाणीवपूर्वक निर्माण केली जात आहे.

# नितीन भौंची गंमत.......!

विदर्भातील माणसे म्हणजे खाण्यात आणि बोलण्यात अगदी अघळपघळ. उगाच कॅलरीचा, डाएटचा विचार करीत आपल्या पोटावर अन्याय करणे त्यांना मान्य नसते. त्याचप्रमाणे पुढच्याला काय वाटेल, त्याच्या भावना तर दुखावल्या जाणार नाही ना, असा विचार करीत इच्छा नसूनही बळेबळे गोड बोलणेही वैदर्भीय माणसाला जमत नाही. थोडक्यात सांगायचे तर नाटकीपणा वैदर्भीय लोकांच्या रक्तातच नाही. जे काही आहे ते रोखठोक. पानात येईल ते खाऊन फस्त करणे आणि मनात येईल ते बोलून मोकळे होणे, असा एकंदरीत वैदर्भीय खाक्या असतो. या वैदर्भीय गुणवैशिष्ट्याचे राष्ट्रीय स्तरावरील चालतेबोलते प्रतीक म्हणजे आमचे नितीन भौ. माणसांवर, खाण्यावर आणि बोलण्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या नितीन भौला पडद्याआडचे राजकारण जमत नाही किंवा तो त्यांचा स्वभावच नाही. त्यामुळे ते नेहमीच मनातले विचार परिणामांची पर्वा न करता मनमोकळेपणाने मांडत असतात. खरे तर मोदींच्या भाजपमध्ये मनमोकळे असणे किंवा मन मोकळे करणे म्हणजे अक्षम्य अपराधच. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी आखून दिलेल्या चौकटीबाहेर जाण्याची कुणी हिंमत करत नाही. असे धाडस करून कर्त्यासवरत्या वयात मार्गदर्शक मंडळात जाणे कुणाला आवडेल? परंतु आपले नितीन भौ म्हणजे वेगळेच रसायन. काही दिवसांपूर्वी त्यांनी एका मुलाखतीत आपल्याला विरोधी पक्ष नेत्याकडून पंतप्रधान पदाचा प्रस्ताव आल्याचे सांगून टाकले. नंतर एका ठिकाणी बोलताना त्यांनी राजा असा असावा की ज्याने प्रत्येकाचे म्हणने ऐकून घ्यायला हवे, विरोधकांचेही मत त्याने समजून घ्यावे असे विधान केले, हे सगळे बोलताना त्यावेळी त्यांच्या मनात नरेंद्रभाईंना काय वाटेल, हा विचार चुकूनही आला नसेल. परवा आपले अधिकारी न्यूटनचे बाप आहेत, फाईलवर वजन ठेवल्याशिवाय फाईल पुढे सरकतच नाही, असे ते बोलून गेले. आत्ता रामदास आठवलेंच्या सत्कार कार्यक्रमात त्यांनी चौथ्यांदा भाजपचे सरकार येईल की नाही, याची शाश्वती नाही; परंतु सरकार कोणाचेही असो, रामदास आठवले मंत्रिपदी कायम राहतील अशी मल्लिनाथी केली. विनोदाच्या अंगाने जळजळीत वास्तव समोर ठेवण्याची कला नितीन भौकडे आहे; परंतु राजकारणात राहून इतका बिनधास्तपणा जोपासणे ही काही गंमत नाही. ही गंमत आपले नितीन भौच करू जाणे.

## स्थित्यंतर



राही भिडे
9867521049

# सणासुदीला महागाईची फोडणी!

केंद्र सरकारने महागाई वाढीचा दर नीचांकी असल्याचे जाहीर केले आहे, तर रिझर्व्ह बँकेने महागाई नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे; परंतु प्रत्यक्षात बाजारातील स्थिती निराळीच आहे. सणासुदीच्या काळात महागाईने सामान्य माणसांच्या तोंडचे पाणी पळवले आहे.

जागतिक बाजारात मंदी आहे. कच्च्या तेलाचे भाव कमी झाले आहेत. अशा स्थितीत सरकारला महागाई आटोक्यात आणता येणे शक्य आहे. आतापर्यंत शेतकरीविरोधी धोरणे घेणाऱ्या सरकारला आगामी निवडणुकीमुळे शेतकऱ्यांचा कळवला आला आहे. लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्याचाही हा परिणाम असावा. सरकार शेतकरी हितासाठी निर्णय घेत आहे असे दिसत असले, तरी आता शेतकऱ्यांकडे शेतीमाल शिल्लक नसल्याने या निर्णयांचा किती फायदा होईल, हे सांगणे अवघड आहे; परंतु शेतकरी हिताच्या नावाखाली घेतलेल्या निर्णयाने सामान्य माणसांचे कंबरडे मोडले आहे. मध्यंतरी अतिवृष्टीने कांदा, कोथिंबीर, टोमॅटोच्या पिकांचे नुकसान झाले. कोथिंबिरीची मोठी जुडी तीनशे चारशे रुपयांना विकली गेली, त्याचा किती शेतकऱ्यांना फायदा झाला आणि सामान्यांच्या जेवणाची चव त्यामुळे कशी बिघडली, हे ज्याचे त्याला माहीत. कर्नाटक, महाराष्ट्रात अतिवृष्टीने कांद्यांच्या पिकाचे नुकसान झाले. उन्हाळी कांदा फारच थोडा शिल्लक आहे. जेव्हा कांदा जास्त होता, तेव्हा सरकारने कांद्याची निर्यातबंदी केली. निर्यातशुल्क वाढवले. आता निर्यातबंदी उठवली, निर्यातमूल्य कमी केले; परंतु भारतीय बाजारात कांद्याला असलेला भाव आणि परदेशी बाजारात असलेला भाव पाहता कांदा निर्यात फारशी होणार नाही. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत दहा जागा कांद्यामुळे महाविकास आघाडीने जिंकल्या. त्यामुळे आता कांदा उत्पादकांचे हित लक्षात घेऊन कांद्याच्या निर्यातीवरची बंदी उठवण्यात आली आणि निर्यातमूल्यही वीस टक्क्यांनी कमी केले असले, तरी त्याचा फारसा फायदा होणार नाही; कारण कांद्याच्या भावाने आताच साठी गाठली असून, तो शंभरी गाठण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कांद्याने मध्य प्रदेश आणि दिल्लीत सत्तांतर घडवले होते, हा इतिहास लक्षात घेता आता ग्राहकाला रडवले, तर शेतकऱ्यांसारखा तो सत्ताधाऱ्यांना धडा शिकवू शकतो. अजून दोन-अडीच महिने तरी कांद्याचे भाव कमी होण्याची शक्यता नाही. हीच बाब टोमॅटोची. अतिवृष्टीने टोमॅटोचे नुकसान झाले. पिकावर रोग पडला. त्यामुळे टोमॅटोचे भाव वाढायला लागले आहेत. कांदा आणि टोमॅटोच्या भावात स्पर्धा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे तेलबिया लागवडीकडे शेतकरी वळावा, तेलबियांना भाव मिळावा, म्हणून परदेशातून येणाऱ्या तेलाच्या आयातीवरील शुल्क सरकारने वाढवले. तेलबियांची लागवड खरिपापेक्षा रब्बीत जास्त असते. त्यामुळे येथेही शेतकऱ्यांचा फायदा किती हा वादाचा मुद्दा बनला आहे. सरकारने तेलाच्या आयातीवरचे शुल्क वाढवल्याने बाजारात लगेच तेल वीस रुपयांनी महागले. गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंतच्या या सणासुदीच्या काळात सरकार महागाईवर नियंत्रण ठेवील, असे कितीही सांगत असले, तरी प्रत्यक्षात बाजारात वस्तुस्थिती वेगळीच आहे.

महागाई म्हणजे बाजारात विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढणे याची अनेक कारणे असू शकतात. जेव्हा कच्चे तेल महाग होते, तेव्हा त्याचा बाजारातील जवळपास प्रत्येक वस्तूवर परिणाम होतो, कारण तेलाचा वापर प्रत्येक वस्तूच्या वितरणात होतो आणि इंधन म्हणून अनेक वस्तूंच्या निर्मितीमध्ये ते आवश्यक असते. जेव्हा आर्थिक विकास जलद गतीने होतो, तेव्हा विकासाचा लाभ घेणाऱ्या समाजातील वर्गाला अधिक पैसा खर्च करण्याची क्षमता मिळते. जर या विभागाची वाढती मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त असेल तर किंमती वाढतात आणि महागाईचा कालावधी सुरू होतो. गेल्या काही वर्षांत अन्नधान्य महागाई हा चिंतेचा विषय राहिला आहे. एप्रिल २००७ ते डिसेंबर २०१३ पर्यंत अन्नपदार्थांचा सरासरी महागाई दर १० टक्के होता. २००९-१० मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या सुमारे २२ टक्के होती. हा विभाग त्यांच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा भाग अन्नावर खर्च करतो आणि त्यांना अन्नासाठी अतिरिक्त खर्च करण्यास भाग पाडले जाते. दुष्काळामुळे अन्नधान्याचा पुरवठा कमी होणे, आंतरराष्ट्रीय किमतीत झालेली वाढ अशी अनेक कारणे महागाईवर परिणाम करतात. आपल्या देशातील बहुतांश लोक संघटित क्षेत्राशी संबंधित नाहीत. शेतकरी, कारागीर आणि छोटे व्यावसायिक यांचे उत्पन्न सरकार किंवा संघटित क्षेत्रासारखे असू शकत नाही. त्यांचा पगार किंवा भत्ता महागाईनुसार वाढत नाही. गेल्या दोन-तीन वर्षांत महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. दूध, डाळी, तांदूळ, भाजीपाला, फळे, तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. गेल्या पाच वर्षांत त्यांच्या किमती ४० ते ८० टक्क्यांनी वाढल्या आहेत; परंतु शेतकरी, कारागिर, मजूर आदींच्या उत्पन्नात त्यानुसार वाढ झालेली नाही. हातमाग उद्योग किंवा शेती अशा अनेक ठिकाणी उत्पन्न किंवा मजुरी कमी झाली आहे. अन्नधान्य महागाई वाढल्याने महिलांना सर्वाधिक फटका बसला आहे. पीठ, डाळी, साखर, तांदूळ, दूध, फळे, भाजीपाला या सर्वसामान्यांच्या बजेटमधील प्राथमिक गरजा आहेत. या अशा गरजा आहेत, ज्या नाकारता येत नाहीत. याच वस्तूंच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. शहरात पेरू शंभर रुपये किलो, केळी साठ रुपये डझन, सफरचंद दोनशे रुपये किलो असे भाव आहेत. कोणत्याही फळाचे भाव कमी झालेले नाहीत. एकीकडे शेतकऱ्यांना दुधाचे अनुदान मिळत नाही, दुसरीकडे ग्राहकांसाठी दूध महाग होत चालले आहे.

देशातील वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर दैनंदिन वस्तूंची विक्री करणाऱ्या एफएमसीजी या घरगुती गरजेच्या वस्तू उत्पादक कंपन्यांमुळे सर्वसामान्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. कच्च्या मालाच्या किमतीत झालेली वाढ हे त्याचे प्रमुख कारण असल्याचे कंपन्या सांगत आहेत. कंपन्यांनी साबण-बॉडी वॉशच्या किंमती २-९ टक्के, केसांच्या तेलाच्या ८-११ टक्के, आणि निवडक खाद्यपदार्थांच्या किमती ३-१७ टक्केने वाढवल्या आहेत. 'नेस्ले'ने कॉफीच्या किमतीत ८-१३ टक्के आणि मॅगी ओट्स नूडल्सच्या किमती १७ टक्क्यांनी वाढवल्या आहेत. गव्हाच्या पिठाच्या किमती ४ टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत. गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्टने साबण आणि डिटर्जंट, कोलगेट पामोलिव्ह बॉडी वॉश, पियर्स बॉडी वॉश शाम्पू यांच्या किमती ४-६ टक्के आणि स्किन केअर उत्पादनांच्या किमती चार टक्क्यांनी वाढवल्या आहेत. केंद्र सरकारने खाद्यतेलावरील सीमा शुल्कात वाढ केल्याने देशांतर्गत बाजारात त्याच्या किमती वाढल्या आहेत. खाद्यतेलाच्या दरात प्रतिलिटर १० ते १५ रुपयांनी वाढ झाली आहे. ही वाढ पाम आणि सोयाबीन तेलावर झाली आहे. सरकारने रिफाइंड तेलावरील सीमाशुल्क १२.५ वरून ३२.५ टक्के केले आहे.

सणासुदीच्या काळात हा दर २० रुपये प्रति लिटर किंवा त्याहूनही अधिक असू शकतो. याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होणार आहे. त्याचबरोबर मोहरीचे तेलही महाग झाले आहे. रिफाइंड आणि मोहरी वगळता इतर खाद्यतेलाच्या दरात किलोमागे १० ते १५ रुपयांची वाढ झाली आहे. सरकारने पाम, सोया आणि सूर्यफूल तेलावरील सीमाशुल्क ५.५ टक्क्यांवरून २७.५ टक्के केले आहे, तर रिफाइंड तेलावर ते १३.७५ टक्क्यांवरून ३५.७५ टक्के केले आहे. त्यामुळे खाद्यतेलाची महागाई वाढली आहे. पावसामुळे सोया, भुईमूग, मोहरी आदी पिकांचे नुकसान झाले आहे. रिफाइंड आणि सोया तेलाबरोबरच मोहरीचे तेलही महाग झाले आहे. गेल्या महिन्यात ते १३० रुपये किलो होते, आता ते १४० रुपये किलो झाले आहे. सीलबंद बाटलीतील मोहरीचे तेल यापेक्षा महाग आहे. त्याचबरोबर पॅकेज केलेल्या पिठाच्या किंमती वाढल्या आहेत. १५० रुपयांना मिळणारी पाच किलोची पिशवी आता १६० रुपये आहे. लसूणचा किरकोळ बाजारातील मुंबईतला भाव पाचशे रुपये आहे, तर छोट्या शहरांत तो चारशे रुपये किलो आहे. म्हणजे फोडणी महागली आहे.

## सरळ-सरळ



राजेश राजोरे
9822593903

# मराठी विषय आता १२ वी पर्यंत सक्तीचा...

शिक्षण विभागाने यापूर्वी राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांना मराठी भाषा शिकविणे अनिवार्य अर्थात सक्तीचे करण्याचा आदेश दि. १ एप्रिल २०२० पासून काढलेले आहे, मात्र या आदेशाचे राज्यात पूर्णपणे पालन होत नाही. अनेक संस्थाचालक राजकारणी किंवा राजकीय वरदहस्ताने 'शिक्षण सम्राट', झाले असल्याने ते अनेक आदेश पाळत नाहीत आणि त्यांच्याविरोधात कडक कारवाई पण होत नाही. या वास्तविकतेचा विचार करुन १२ वी पर्यंतचा 'मराठी विषय सक्तीचा' या निर्णयाकडे पाहिले पाहिजे.

***घासल्याशिवाय धार नाही***
***तलवारीच्या पातीला***
***मराठीशिवाय अर्थ नाही***
***महाराष्ट्राच्या मातीला***

*महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १३ सप्टेंबर २४ रोजी काढलेल्या आदेशात राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय (उच्च माध्यमिक विद्यालय) अर्थात ११ वी १२ वीसाठी मराठी विषय सक्तीचा केला आहे. यामुळे इयत्ता १२ वीपर्यंत मराठी विषय अनिवार्य झाला असून मराठी विषयाला कोणताही विकल्प राहणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.*

*महाराष्ट्रातील संत साहित्याचा, महापुरुषांचा, समाजसुधारकांचा, थोर साहित्यिकांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, मराठी भाषेचे संवर्धन व जतन व्हावे, यासाठी मराठी विषय सक्तीचा करणे आवश्यक होते. विशेष म्हणजे कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाची ही जुनी व आग्रही मागणी होती. तर या मागणीसाठी मराठी साहित्यिकांनीही आग्रही व्हावे म्हणून महासंघाने अमळनेर येथील ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये ठराव घेण्याची विनंती २ फेब्रुवारी २०२४ च्या पत्रान्वये महासंघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल डिसले बारामती यांनी केली होती. संमेलनात मात्र हा ठराव झाला नाही, असो.*

*महाराष्ट्रात शिक्षण घेणाऱ्यांना, राहणाऱ्यांना व महाराष्ट्रीयन असल्याचा अभिमान बाळगणाऱ्या पालकांना व विद्यार्थ्यांना 'मराठी' हा विषय आवडीचा वाटू नये? या विषयाची 'सक्ती' करावी लागते, हेच मोठे दुर्दैव आहे. अशी मराठी भाषेची दुरवस्था होण्यासाठी जबाबदार कोण? हा प्रश्न पडतो. यातही दुर्दैवाने मराठी भाषा प्रेमी साहित्यिक, वृत्तपत्रे, पत्रकार, शिक्षक, पालक आणि प्रामुख्याने शिक्षण संस्थांचे पदाधिकारी आदी सर्वच जबाबदार आहेत.*

*मागच्या काळात इयत्ता ११ वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकण्यापासून दूर ठेवण्याचे काम संस्थाचालकांनी केले. आय.टी. हा विनाअनुदानीत तत्वावरील विषय मराठी विषयाला पर्याय देण्यात आला. या विषयासाठी विद्यार्थ्यांना जास्तीची फी आकारुन कमी पगारात आय.टी. शिक्षकांची नियुक्ती केल्या गेली. आर्थिक लोभापायी संस्थापातळीवर विद्यार्थ्यांना आय.टी. विषय घेण्यास सक्तीने भाग पाडले, आणि अनेक कनिष्ठ महाविद्यालयाने मराठी विषय शिकविणे बंद केले. ही शोकांतिका आहे. मराठी विषयी असलेली अनास्था, मराठीला दुय्यम लेखणे, मराठीचे महत्त्व समजून न घेता तिची अवहेलना करणे, प्रामुख्याने ही कामे मराठी प्रेमी म्हणवून घेणाऱ्यांनी करणे, ही प्रवृत्तीच चुकीची आहे. म्हणूनच मराठी माध्यमांच्या बंद झालेल्या व होणाऱ्या शाळा वाचवा, दुकानांवर मराठीत पाट्या लावा, मराठी भाषेतच कार्यालयीन कामकाज करा, शक्य त्या ठिकाणी मराठी बोलणे, लिहिणे, अनिवार्य करा, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्या, असा सूर काही सुज्ञांकडून अधूनमधून व्यक्त होतो. मराठीच्या व्यापक हिताच्या चळवळीचे संयोजक, थोर साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी, नागपूर यांच्याकडून अशी चळवळही चालविली जात आहे.*

*आता मराठी विषय सक्तीचा केल्याचा आदेश काढला, मात्र फक्त सक्ती करुन हा विषय व याचे महत्त्व अधोरेखीत होणार नाही. याचे अंमलबजावणीसाठी सर्वांनी काम करण्याची गरज आहे. मराठी विषयक विविध संस्था, संघटना, शिक्षक, साहित्यिक, मराठी वृत्तपत्रे, पत्रकार यांनी या कायद्याचा उपयोग करुन घेत मराठीचा जम बसविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. मराठी हा विषय अनेकांची रोजी रोटी आहे म्हणूनच नव्हे तर मातृभाषा असल्याने अनेक कठीण विषय समजण्यासाठी, संवर्धनासाठी गरजेचे आहे, म्हणून मराठीचा प्रचार व प्रसार व्हायला पाहिजे. मराठी वृत्तपत्र काढणाऱ्या मोठ्या अनेक व्यवस्थापनांनी इतर भाषेत वृत्तपत्रे काढली असली तरी मराठी टिकून राहणे त्यांच्या मराठी वृत्तपत्रांसाठी गरजेचे आहे.*

*शिक्षण विभागाने यापूर्वी राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांना मराठी भाषा शिकविणे अनिवार्य अर्थात सक्तीचे करण्याचा आदेश दि. १ एप्रिल २०२० पासून काढलेले आहे, मात्र या आदेशाचे राज्यात पूर्णपणे पालन होत नाही. अनेक संस्थाचालक राजकारणी किंवा राजकीय वरदहस्ताने 'शिक्षण सम्राट', झाले असल्याने ते अनेक आदेश पाळत नाहीत आणि त्यांच्याविरोधात कडक कारवाई पण होत नाही. या वास्तविकतेचा विचार करुन १२ वी पर्यंतचा 'मराठी विषय सक्तीचा' या निर्णयाकडे पाहिले पाहिजे. किंबहुना यासाठी सर्वांनी आग्रही राहणे, मराठी वृत्तपत्रांनी 'वॉच डॉग' ची भूमिका वठविणे आवश्यक ठरते. एवढे मात्र खरे! शेवटी मराठी बहरली पाहिजे, यासाठी प्रयत्न करतांना लक्षात ठेवण्यासारख्या चार ओळी आठवतात...*

***कीर्तन, भजन, ओवी, पोवाड्याने***
***माझी मराठी सजली***
***शब्द अलंकाराचा साज लेवून***
***माझी मराठी बहरली...***

## वास्तव



स्नेहा राज
9967015899

# 'तिरुपती मंदिराच्या लाडवांचेही राजकारण'!

लोकांना पाच वर्षांतून एकदा मतदान करण्याची संधी मिळते तर पुढील पाच वर्षांच्या काळात राजकीय पक्ष आणि नेते त्यांच्या मनमानी पद्धतीने कारभार सुरू ठेवतात तो मतदारांच्या उद्धारासाठी असतोच असे नाही. आजकाल एकमेकांविरोधात मत्सर, द्वेषाचे राजकारण न करणारे राजकीय नेते आढळतात ते अभावानेच! पण आपल्या प्रतिनिधींना निवडून देतो तेव्हा काय करून ठेवले आहे हे मतदारांना लक्षात येईपर्यंत पाच वर्षांचा काळ निघून गेलेला असतो. हेच चित्र मागील काही वर्षांपासून दिसून येत आहे, कारण ही लोकशाही आहे. आपणही त्यास जबाबदार आहोत म्हणूनच हे मान्य करावे लागेल!

तिरुपती बालाजी मंदिरात प्रसाद म्हणून देण्यात येणारा लाडू जनावरांच्या चरबीचा वापर करून बनविण्याची प्रक्रिया जगमोहन रेड्डी यांच्या काळापासून सुरू झाली आहे, असे आरोप करीत चंद्राबाबू नायडू यांनी जगमोहन रेड्डी यांना राजकीयदृष्ट्या घेरण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. मंदिराच्या प्रसादात गोमांस, चरबी आणि माशाचे तेल वापरले आहे असे प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या चाचणीतून उघडकीस आल्यावर राजकीय पक्षांच्या वादाना सुरुवात झाली आहे. चंद्राबाबू नायडू यांनी वायएसआर काँग्रेसच्या सत्ता काळात मंदिर प्रसादाच्या रूपाने दिल्या जाणाऱ्या लाडवात तुपाऐवजी प्राण्यांच्या चरबीचा वापर करण्यास सुरुवात झाली असे म्हटले आहे. मात्र, त्यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर मंदिर प्रसादात शुद्ध तुपाचा वापर करण्यास सुरुवात केली आहे, असे पुढे म्हटले आहे. त्याला उत्तर म्हणून वायएसआरपी काँग्रेसच्या अध्यक्षांनी नायडूंच्या आरोपांचे खंडन केले आहे. तर मंदिर युनियनच्या प्रतिनिधींनी देवस्थानच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक घटक तपासल्यानंतरच पुढील प्रक्रिया पार पाडली जाते ती केंद्र सरकारच्या देखरेखीखाली, असे विधान करत प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला असे म्हणत देवस्थानच्या पुष्टीनंतरच प्रसादाच्या वस्तू वितरित केल्या जातात, असे स्पष्टीकरण दिले आहे. त्यानंतर चंद्राबाबू नायडू यांनी वायएसआरपी आणि तेलगू देसम यांच्यावर भाविकांच्या भावना दुखावल्याचे आरोप करीत जगमोहन रेड्डी आणि त्यांच्या पक्षाला घेरले आहे. यावरून लक्षात येते की सध्या राजकीय पक्ष हे निवडणुकांचा काळ असो अथवा नसो एकमेकांवर आरोप, प्रत्यारोप, कुरघोड्या करण्याच्या प्रयत्नांत व्यस्त असतात. मागील काळातील आरोपांचे खंडन करणे, त्याचे बदले घेणे असे उद्योग सुरू ठेवतात. त्यामुळे ज्या कामांसाठी लोकं मतदान करून निवडून देतात ती कामे बाजूस ठेवली जातात आणि लोकांच्या भल्याऐवजी वैयक्तिक भले साधण्याचे प्रयत्न केले जातात. लोकांना पाच वर्षांतून एकदा मतदान करण्याची संधी मिळते तर पुढील पाच वर्षांच्या काळात राजकीय पक्ष आणि नेते त्यांच्या मनमानी पद्धतीने कारभार सुरू ठेवतात तो मतदारांच्या उद्धारासाठी असतोच असे नाही. आजकाल एकमेकांविरोधात मत्सर, द्वेषाचे राजकारण न करणारे राजकीय नेते आढळतात ते अभावानेच! पण आपल्या प्रतिनिधींना निवडून देतो तेव्हा काय करून ठेवले आहे हे मतदारांना लक्षात येईपर्यंत पाच वर्षांचा काळ निघून गेलेला असतो. हेच चित्र मागील काही वर्षांपासून दिसून येत आहे, कारण ही लोकशाही आहे. आपणही त्यास जबाबदार आहोत म्हणूनच हे मान्य करावे लागेल!

गोरेगाव, मुंबई

## वाचक विचार मंच

# पंतप्रधान मोदींना ७५ व्या वर्षी निवृत्ती का नाही? केजरीवाल यांचा सवाल...

आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींना ७५ व्या वर्षी निवृत्ती का नाही ? असा सवाल करून भाजपा आणि संघावर निशाणा साधला आहे. नुकताच दिल्लीतील जंतर मंतरवर आयोजित जनता की अदालत कार्यक्रमात असे वक्तव्य केल्याचे वृत्त वाचनात आले १७ सप्टेंबर रोजी पीएम मोदींनी वयाची ७४ वर्षे पूर्ण करून ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याने केजरीवाल यांनी असे वक्तव्य केले असावे. लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, कलराज मिश्रा यांच्यासारखे पक्षाचे ज्येष्ठ नेते ७५ व्या वर्षात निवृत्त झाले आहेत मग मोदींना हा नियम का लागू होत नाही अशी त्यांनी विचारणा केली आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे, अशा शब्दांत केजरीवाल यांनी भाजपासह आरएसएसलाही धारेवर धरले आहे. मोदींनी प्रलोभने आणि ईडीसारख्या तपास यंत्रणा वापरुन अनेक पक्ष नेस्तनाबूत केले आहेत तर अनेक भ्रष्ट नेत्यांना आपल्या पक्षात सामावून घेतले आहे. अनेक राज्यांतील सरकारे पाडली आहेत, असा गंभीर आरोपदेखील त्यांनी केला आहे. असला प्रकार भारतीय लोकशाहीसाठी घातक असून यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गप्प का? याचा अर्थ त्यांना हा सर्व कारभार मान्य आहे का? यासारखे मुद्दे उपस्थित करून कमाल केली आहे. नुकताच तिहार तुरुंगातून जामिनावर बाहेर आल्यावर केजरीवाल यांनी पीएम मोदींवर अशी तोफ डागली आहे त्यामुळे आगामी काळात दिल्लीचे राजकारण कोणते वळण घेते ते पाहणे मोठे औत्सुक्याचे ठरणार आहे!

**राजू जाधव**
मांगूर, जि.बेळगाव

**धक्कातंत्र**

गोविंदबागेला
समजते
प्रत्येक गोष्टीला अंत आहे
म्हणूनच तर अजूनही
सिल्व्हरओक शांत आहे

हवामानाचा अंदाज
साहेबांचा पक्का असतो
ह्यांच्या खिशात नेहमी
हुकुमाचा एक्का असतो

'शरद'ऋतुच्या चांदण्यात
सर्व काही होते लख्ख
ह्यांनी बाजी मारताच
होतात भलेभले थक्क

ह्यांचा स्ट्राईक रेट बघून
सर्वजण म्हणतात व्वाऽऽ
कमळाबाईला प्रश्न पडतो
ह्यांना हे कसं जमते ब्वॉऽऽ

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद


# 'एक देश एक निवडणूक' शक्य होण्यासाठी मोठा आटापिटा..!

माजी राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापलेल्या उच्चस्तरीय समितीने लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याच्या शिफारशींनंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक राष्ट्र एक निवडणूक' हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्याची अंमलबजावणी दोन टप्प्यांत केली जाईल. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी होतील. दुसऱ्या टप्प्यात स्थानिक निवडणुका म्हणजेच पंचायत आणि महामंडळ यांच्या निवडणुका घेण्यात येतील. दोन्ही टप्प्यांच्या निवडणुकीमधील अंतर १०० दिवसांचे राखण्याची तरतूद असेल. यामुळे निवडणुकांचा खर्च वाचविता येईल, वेळ वाचणार आहे, नेहमीप्रमाणे निवडणुकांचे पडघम वाजणार नाहीत परिणामी लोकांना वारंवार मतदान करण्याची गरज भासणार नाही, सामाजिक ऐक्य वाढीस लागेल असे अंदाज व्यक्त केले जात आहेत. त्याचवेळी निवडणुकीच्या काळात सुरक्षा रक्षकांचा बंदोबस्त करणे, राज्याराज्यांतील बदलते हवामान आणि निवडणूक आयोगाची लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याची तयारी होऊ शकते का, यांविषयी असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यांना विविध राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष स्थानिक आघाड्या यांचे एकमत होणे सहज शक्य होईल असे नाही. याच कारणांनी विरोधक, सामाजिक संस्था यांसारख्या विविध मंचांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल असे सरकारपक्षातर्फे समर्थन केले जात असताना विरोधी पक्षांनी निवडणुका जवळ आल्यावर सरकार अशा प्रकारचे निर्णय घेते ते व्यवहारी ठरत नाही, असे म्हणत या प्रस्तावाला विरोध केला आहे.

निवडणुकीच्या निकालांत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही किंवा आघाडी स्थापन होऊ शकली नाही किंवा आघाडी पाच वर्षे टिकू शकली नाही तर काळजीवाहू सरकार स्थापन करावे का, त्याची मुदत किती काळ असेल वगैरेसंबंधीची सविस्तर स्पष्टता होणे बाकी आहे. तसेच ही योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी घटनेत दुरुस्ती करावी लागणार आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात दुरुस्ती विधेयक दोन तृतीयांश या बहुमताने संमत होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही दुरुस्ती विधेयकांना किमान अर्ध्या राज्यांची संमती आवश्यक आहे. काही पक्ष या योजनेस जरी पाठिंबा दर्शवित असले, तरी काँग्रेससह काही पक्षांनी विरोध दर्शविला आहे त्यामुळे एकत्र निवडणुकीचा प्रस्ताव कागदोपत्री चांगला वाटत असला, तरी भारतासारख्या विविध प्रांतांत, राज्यांत विभागलेल्या निवडणूक आयोगाला मतदार याद्या एकाचवेळी अद्ययावत करणे शक्य होईल का अशाप्रकारचे विविध मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यावर तोडगे काढण्याचे मोठे काम प्रशासक व निवडणूक आयोगाला यशस्वीरित्या पार पाडणे आवश्यक आहे. याशिवाय निवडणुकांसंबंधी मुद्यांवर सर्व पक्षांचे एकमत झाल्यास 'एक राष्ट्र एक निवडणूक' या प्रस्तावाची अंमलबजावणी राष्ट्रहिताची ठरेल असे वाटते.'

**राजन पांजरी,**
जोगेश्वरी, पूर्व मुंबई
मो.नं.९८१९७००८१८

## गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

# झोपू दे मले...

'मामा वावरात गेले काय मामी?'

'वावरात निंदाले बाया धाडून देल्या अन् हे घरी येऊन झोपले.'

'तब्येत बरी नाही काय?'

'तब्येतले काय झालं? आताच तं संड जेवले.'

'मंग वावरातच शिदोरी न्या लागत होती. बायामागं घरचा मानूस पाह्यजे.'

'पंक्या गेला गाळी घेऊन! तुमच्या मामाले झोपच सुचू देत नाही. राती आठले झोपले की सकाऊन आठलेच उठतात. बारा घंटे कळ फेरत नाहीत. तेही सकाऊन आवाज देऊन उठवा लागते.. आवाज देला नाही की दुसऱ्या दिवशी दोन वाजेलोक उठत नाहीत.'

'अशी कोनती झोप व्हय लेकाची?'

'एक डाव मी गावाले गेली.. हा बुवा रात्री आठ वाजता झोपला. दुसऱ्या रोजी संध्याकाईच उठला.'

'अशी झोप नाही पाह्यली आपून.. मले त खुळकन वाजलं की जाग येते.'

'या बुवाले जागच येत नाही. त्यारोजी रात्री घरापासून गनपतीची मिरवनूक गेली. मोठ्यानं गाने वाजवले. सारं गाव दनानलं पन या बुवानं डोये उघडले नाहीत.'

'मंग हे काहीतरी अलग बिमारी आहे.'

'बिमारी नाई ते.. करतूक करेल आहे.'

'म्हनजे?' 'मले वाटते कोनंतरी खायात देलं तुमच्या मामाले.'

'खायात देलं तं एक दिवस झोपून राहीन.. हे बिमारी लय दिवसाची आहे ना..'

'लगनाच्या आगुदरपासून हाय म्हनतात.'

'कुंभकर्नाले हेच बिमारी होती. तो मयनाभर झोपे म्हनतात.'

'पन हे बरोबर नाही ना.. लय खेप हा बुवा एसटीत झोपला. एकखेप दर्यापुरले एसटीत बसून चालले होते. झोप लागून गेली. डायरेक अमरावतीले उतरले.'

'देऊ काय उठून?'

'द्या आवाज.. सैपाक झाला म्हना.'

'ओ मामा... उठाहो.. साडेबारा झाले.'

'तोंडावर पानी मारा.! हे घ्या पानी..'

'काय व्हय बे?'

'उठाना.. कितीक झोपता राज्या?'

'दिवस निंगाला काय?'

'झोपीत काहीच भान नाही तुमाले.. जेऊन घ्या.'

'मले भंडाऱ्यात जेवाले जा लागते.'

'कालच झाला भंडारा.. आता दुसरा दिवस निंगाला..'

'झोपू दे जराभर.. मले भूक नाही.'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीत ११७ कोटींचा भ्रष्टाचार

देशोन्नती वृत्तसंकलन



**बेंगळूर :** वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीत ११७ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री डॉ. शरणप्रकाश पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विधानपरिषद सदस्य एन. रविकुमार यांनी केली आहे. मल्लेश्वर येथील भाजप प्रदेश कार्यालय जगन्नाथ भवन येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधीश किंवा स्वतंत्र तपास संस्थेमार्फत करावी. मुख्यमंत्र्यांनी तातडीने मंत्री डॉ. शरणप्रकाश पाटील यांचा राजीनामा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत आम्ही येत्या २४ तारखेला लोकायुक्तांकडे तक्रार करणार आहोत. प्रदेशाध्यक्षांशी चर्चा करून माननीय राज्यपालांनाही निवेदन दिले जाईल.



**विल्मिंग्टन:** भारत आपला पहिला राष्ट्रीय सुरक्षा सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्प स्थापन करणार आहे. जो अमेरिका सशस्त्र सेना, सहयोगी सैन्य आणि भारतीय संरक्षण दलांना चिप्स पुरवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्यात शनिवारी विल्मिंग्टनमध्ये झालेल्या चर्चेनंतर या महत्त्वाकांक्षी भारत-अमेरिका संयुक्त प्रकल्पाची घोषणा करण्यात आली.

# जेडीएसला मोठा धक्का! १३ नगरसेवकांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

देशोन्नती वृत्तसंकलन

**बंगळुरू :** जनता दल सेक्युलरला कर्नाटकात मोठा धक्का बसला आहे. चन्नपटना सिटी म्युनिसिपल कौन्सिलमध्ये जेडीएसच्या १६ पैकी १३ नगरसेवकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे पक्षांतर कायद्यापासूनही या नगरसेवकांची सुटका झाली. १६ पैकी १३ नगरसेवकांनी हा निर्णय घेतल्याने दोन तृतीयांश बहुमत झाले आहे. इतक्या मोठ्या संख्येने नगरसेवकांना काँग्रेसमध्ये सामावून घेण्यामागे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांची रणनीती मानली जात आहे.

चन्नपटनामध्ये काँग्रेसला मजबूत करण्यासाठी डीके शिवकुमार यांनी हे पाऊल उचलले आहे. चन्नपटना एक वोक्कालिंगा बहुल तालुका आहे. ज्याठिकाणी दोन्ही पक्ष एकमेकांचे कट्टर विरोधक आहे. ही राजकीय उलथापालथ चन्नपटना विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या



पोटनिवडणुकीपूर्वी झाली आहे. चन्नपटना विधानसभा मतदारसंघात एचडी कुमारस्वामी आमदार होते; परंतु ते मांड्या लोकसभा जागेवरून खासदार म्हणून निवडून आल्याने ही जागा रिक्त झाली. शिवकुमार हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांनी चन्नपटना पोटनिवडणुकीकडे व्यक्तिगत लक्ष दिले आहे, कारण याठिकाणी त्यांचे बंधू डिके सुरेश जे बंगळुरू ग्रामीण लोकसभा मतदारसंघात भाजप-जेडीएस युतीकडून पराभूत झाले होते.




## ■ मुस्लिमांच्या हितासाठीच सुधारणा विधेयक ■ केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांचे प्रतिपादन

# वक्फ बोर्डातील गैरप्रकार बंद व्हावा

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** वक्फ बोर्डाच्या जागांचा बेकायदा आणि गैरवापर बंद व्हावा, या जागा मुस्लिमांच्या हितासाठीच योग्य पद्धतीने वापरात येण्यासाठी सुधारणा विधेयक मांडण्यात आले आहे. मात्र, सरकार मुस्लिमांच्या जमिनी काढून घेणार असल्याचा अपप्रचार केला जात आहे. हा अपप्रचार तातडीने थांबवावा, कोणीही या विधेयकाची चुकीची मांडणी करून दिशाभूल करू नये, असे केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोमवारी पुण्यात स्पष्ट केले.

मॉडर्न महाविद्यालयातील युवा कनेक्ट कार्यक्रमासाठी आलेल्या रिजिजू यांनी कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधला. वक्फ कायद्यात बदल व्हावा, जागांचा योग्य वापर व्हावा, यासाठी या कायद्यातील सुधारणांना मुस्लीम समाजातील अनेक संघटनांनीही पाठिंबा दिला आहे. हे विधेयक सध्या संयुक्त संसदीय समितीसमोर आहे. त्यावर नागरिकांनी सव्वा कोटींहून अधिक हरकती सूचना पाठवल्या आहेत. हा एक जागतिक विक्रम आहे. इतक्या हरकती सूचना येतील, असा विचारही कोणी केला नव्हता. यातील सर्व हरकती सूचनांची दखल घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## दिल्लीच्या रिमोट कंट्रोल मुख्यमंत्री

आतिशी या दिल्लीच्या रिमोट कंट्रोल मुख्यमंत्री असतील. केजरीवाल यांना मुख्यमंत्री म्हणून त्यांची कर्तव्य बजावता येणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आतिशी यांनी मुख्यमंत्री पदाची खुर्ची रिकामी ठेवल्यास त्याला काहीही अर्थ नाही, असेही रिजिजू म्हणाले. केंद्र सरकारची कामगिरी, राज्यातील महायुती सरकारची कामगिरी पाहून महाराष्ट्राची जनता महायुतीलाच पाठिंबा देईल. राज्यात जातीपातीवरून विभाजन करण्याचा प्रयत्न योग्य नाही, असेही त्यांनी सांगितले.

# कुख्यात गुन्हेगार राजाचा एनकाउंटर

देशोन्नती वृत्तसंकलन

**चेन्नई :** तामिळनाडूतील प्रसिद्ध हिस्ट्रीशिटर राजा उर्फ सीसिंग राजा याचा पोलिसांच्या चकमकीत मारला गेला आहे. चेन्नईतील अक्कराई येथे पोलिसांनी एका कुख्यात गुन्हेगाराला चकमकीत ठार केले आहे. बसपा नेत्याच्या हत्येप्रकरणी रविवारी पोलिसांनी त्याला आंध्र प्रदेशातून अटक केली. पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना गोळ्या झाडून त्याचा मृत्यू झाला. त्याला चेन्नईला आणत असताना ही चकमक झाली. चेंगलपट्टू येथे राहणारा राजा हा कुख्यात गुंड होता. छोटे-छोटे गुन्हे करून गुन्हेगारीच्या जगात प्रवेश केला.

राजा याच्यावर यापूर्वी प्रसिद्ध व्यावसायिकांना धमकावणे, त्यांचे अपहरण करणे, पैशांची मागणी

## आर्मस्ट्राँग यांच्या हत्येत सहभाग



करणे आदी गुन्ह्यांमध्ये सहभाग होता. हळूहळू तो गुन्हेगारीच्या जगात प्रसिद्ध होऊ लागला आणि त्यानंतर गुन्ह्यांच्या ए प्लस यादीत त्याचा क्रमांक लागला. आठवडाभरात चेन्नईतील ही दुसरी आणि आर्मस्ट्राँगच्या हत्येनंतरची तिसरी चकमक आहे. सध्या या प्रकरणी फारशी माहिती मिळालेली नाही. राजाविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी व अपहरण असे ३० गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर ३३ खटले प्रलंबित होते. बहुजन समाज पक्षाचे नेते आर्मस्ट्राँग यांच्या हत्येतील तो मुख्य आरोपी होता. यापूर्वी १८ सप्टेंबर रोजी चेन्नईच्या व्यासरपाडी भागात चकमकीत गुन्हेगार कक्का थप्पू बालाजी मारला गेला होता. त्याच्यावर ६ खुनाचे, १७ खुनाचा प्रयत्न आणि अंमली पदार्थांच्या व्यापारातील एका गुन्ह्यातील ५८ गुन्ह्यांमध्ये आरोपी होते. बसपा नेते आर्मस्ट्राँग यांची १२ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ वाजता पेरांबदूर येथे बांधण्यात येत असलेल्या घराकडे जात असताना त्यांची हत्या करण्यात आली होती. यावेळी त्यांच्यासोबत उपस्थित असलेले चार जणही या हल्ल्यात जखमी झाले. आर्मस्ट्राँग यांना त्यांच्या समर्थकांनी स्थानिक रुग्णालयात नेले आणि नंतर त्यांचा तेथे मृत्यू झाला, असे पोलीस आयुक्तांनी सांगितले होते.

# बिहारमध्ये भूमी सर्वेक्षणाला स्थगिती

## नितीश कुमार सरकारचा निर्णय

देशोन्नती वृत्तसंकलन

**पाटणा :** बिहारमधील नितीश कुमार सरकारने जमिनींचे वाद सोडवण्याच्या उद्देशाने राज्यात भूमी सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. १९१४ नंतर पहिल्यांदाच असे सर्वेक्षण होत असल्याने बहुतेक जमिनींचे वाद सुटतील, अशी अपेक्षा सरकारला होती. मात्र, हा निर्णय आता वादाच्या भोवऱ्यात सापडला असून सरकारने या सर्वेक्षणाला स्थगिती दिली आहे. विरोधकांकडूनही या निर्णयावर टीका केली जाते आहे.

बिहार सरकारने २० ऑगस्टपासून राज्यात भूमी सर्वेक्षणाचे काम सुरू केले होते. मात्र, ऑनलाइन पद्धतीने जमिनीची कागदपत्रे अपलोड करताना अनेक अडचणी येऊ लागल्या. याशिवाय जिल्हा पातळीवर भ्रष्टाचाराची प्रकरणेदेखील उघडकीस आली. एकंदरित परिस्थिती बघता आता बिहार सरकारने जुलै २०२५ पर्यंतची दिलेली मुदत अनिश्चित काळासाठी वाढवली आहे.


# 12 देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या ताफ्यावर हल्ला

## इस्लामाबादला जातानाच बसमध्ये स्फोट

देशोन्नती वृत्तसंकलन

**इस्लामाबाद :** पाकिस्तानमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. दहशतवादासाठी जगभरात ओळखल्या जाणाऱ्या शाहबाजच्या देशाचा पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर अपमान झाला. १२ देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना इस्लामाबादला घेऊन जाणाऱ्या बसजवळ मोठा स्फोट झाला. मुत्सद्दींना घेऊन जाणाऱ्या बसच्या मागे सुरक्षेसाठी मोठा पोलीस फौजफाटा आणि लष्कर तैनात करण्यात आले होते, मात्र त्यानंतर ताफ्यातील बसमध्ये स्फोट झाला. मिळालेल्या माहितीनुसार, सर्व राजनयिक सुरक्षित आहेत.

पाकिस्तानच्या अशांत वायव्य-पश्चिम



खैबर पख्तूनख्वा प्रांतात रविवारी परदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आले. या स्फोटात एका पोलिसाचा मृत्यू झाला. अन्य तिघे जखमी झाले. पोलिसांनी याबाबत माहिती दिली. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, हा स्फोट रिमोटद्वारे करण्यात आला असून हा काफिला इस्लामाबादहून स्वात जिल्ह्यातील सुंदर डोंगराळ भाग असलेल्या मालम जब्बाकडे जात होता. सर्व मुत्सद्दी सुरक्षित असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. या ताफ्यात रशिया, व्हिएतनाम, बोस्निया आणि हर्जेगोविना, इथिओपिया, रवांडा, झिम्बाब्वे, इंडोनेशिया, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, कझाकिस्तान आणि पोर्तुगाल या देशांतील मुत्सद्दींचा समावेश होता.

# अमेरिकेत पुन्हा स्वैर गोळीबार; 4 ठार तर 18 जखमी

वृत्तसंस्था

**बर्मिंगहॅम, (अल्बामा) :** अमेरिकेत स्वैर गोळीबाराची आणखी एक घटना घडली असून या गोळीबारात ४ जण ठार आणि १८ जण जखमी झाले आहेत. अल्बामा प्रांतात बर्मिंगहॅम येथे ही घटना घडली. ठार झालेले बहुतेक जण गोळीबारामध्ये सापडल्यामुळे मरण पावले आहेत, असे पोलिसांनी सांगितले. या गोळीबाराशी संबंधित बंदूकधाऱ्यांबाबत माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी स्थानिक जनतेला केले आहे.

फाइव्ह पॉइंट्स साउथ एंटरटेनमेंट डिस्ट्रिक्टमध्ये शनिवारी रात्री ११ वाजल्यानंतर काही वेळातच गोळीबार झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांना दोन पुरुष आणि एक महिला फुटपाथवर बंदुकीच्या गोळीने जखमी झालेल्या आढळून आली आणि त्यांना तेथे मृत घोषित करण्यात आले. गोळीबार झालेल्या आणकी एका पुरुषाला रुग्णालयात मृत घोषित करण्यात आले. अनेक संशयितांनी सार्वजनिक ठिकाणी बाहेर असलेल्या लोकांच्या मोठ्या



गटावर गोळीबार केला असल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. ही एक अपवादात्मक घटना नसावी, असे पोलिसांनी सांगितले. जखमी लोकांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे. रविवारी पहाटेपर्यंत, पोलिसांनी जखमी झालेल्या इतर १८ जणांची ओळख पटवली होती. त्यापैकी काही गंभीर जखमी झाले होते. ज्याला लक्ष्य करायचे होते, त्याचादेखील या गोळीबारात मृत्यू झाला असावा, असा पोलिसांचा संशय आहे. संशयित एका वाहनात बसले होते. ते वाहनातून बाहेर पडले आणि त्यांनीस्वैर गोळीबार केला. परत वाहनात बसून त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला, असे पोलीस अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या घटनेनंतर तत्काळ कोणालाही अटक झाली नाही.

# जगन्नाथ मंदिर रत्नभांडारात दुसऱ्यांदा सर्वेक्षण सुरु

वृत्तसंस्था

**पुरी:** भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) विभागाने शनिवारी दुपारी पुरीतील जगन्नाथ मंदिराच्या रत्नभांडारमध्ये पुन्हा सर्वेक्षण सुरू केले. हे सर्वेक्षण आज सोमवारी संपणार आहे. सर्वेक्षण होतानाच्या कालावधीत भाविकांना दुपारी १ ते सायंकाळी ६ या वेळेत दर्शन घेण्यास मनाई होती. येथे १८ सप्टेंबर रोजी पहिले सर्वेक्षण करण्यात आले.

## दुपारी १ ते ६ दरम्यान दर्शन घेण्यास होती मनाई

ओडिशातील पुरी येथील जगन्नाथ मंदिराचा खजिना १४ जुलै रोजी उघडण्यात आला. येथे सापडलेल्या मौल्यवान वस्तूंची डिजिटल यादी केली जात आहे. या नोंदींमध्ये त्यांचे वजन आणि निर्मितीसंबंधीचा तपशील नमूद करण्यात येणार आहे.

# इरीट्रियात पुरुषांना दोन लग्न करणे बंधनकारक

वृत्तसंस्था

## नियम न पाळल्यास केली जाते शिक्षा

**वॉशिंग्टन :** सामान्यपणे लोक आयुष्यात एकच लग्न करतात, पण याबाबतही वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे नियम आहेत. काही लोक दोन किंवा त्यापेक्षा जास्त लग्न करतात, पण असे करणे त्यांना बंधनकारक असतेच असे नाही, पण जगात असाही एक देश आहे जिथे पुरुषांना दोन लग्न करणे बंधनकारक आहे. एखाद्या पुरुषाने जर दोन लग्न करण्यास नकार दिला तर त्यांना कठोर शिक्षाही होते. पण हे कायदे दुसऱ्या कोणत्याच देशात नाहीत. इरीट्रिया असे या आफ्रिकन देशाचे नाव आहे.

इथे पुरुषांना दोन लग्न करणे अनिवार्य आहे. जर कुणी दोन लग्न करण्यास नकार दिला किंवा दोन पत्नी ठेवण्यास नकार दिला तर त्या व्यक्ती विरोधात कठोर कारवाई केली जाते.

## घरात वन्यप्राण्यांचे अवशेष बाळगल्याप्रकरणी एकास अटक

**जोयडा :** घरात वन्यप्राण्यांच्या अवशेषांचा बेकायदेशीर साठा करणाऱ्या गांधीनगर-दांडेली येथील एकास वन विभागाने अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या इसमाचे पक्रूसाबा शेख असे नाव असून त्याच्याकडून गवा आणि हरणाचे शिंग जप्त करण्यात आले आहे.

# अठरा वर्षे भरले शेजाऱ्याचे वीजबिल

## कंपनीच्या चुकीमुळे घडला प्रकार

वृत्तसंस्था



**कॅलिफोर्निया :** अमेरिकेच्या कॅलिफोर्निया प्रांतातील एक वीजग्राहक केन विल्सन यांनी आपल्या शेजाऱ्याचे वीजबिल आपलेच समजून १८ वर्षे भरले, अशी घटना समोर आली आहे. हे त्यांनी शेजाऱ्यावर उपकार म्हणून केले नाही, किंवा त्याला साहाय्य व्हावे म्हणूनही केलेले नाही. तर ते ज्या वीजकंपनीचे ग्राहक आहेत, त्या कंपनीच्या चुकीमुळे असा प्रकार घडला आहे. आता तो उघडकीस आल्याने या कंपनीने त्यांची क्षमायाचना केली असून त्यांना झालेल्या हानीची भरपाई करण्याचे आश्वासन दिले आहे.




**हैद्राबाद :** साऊथ फिल्म स्टार चिरंजीवी कोनिडेला यांचा भारतीय सिनेविश्वातील सगळयात सुप्रसिद्ध सिने अभिनेते म्हणून सन्मान करण्यात आला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेतर्फे हा सन्मान करण्यात आला असून हैद्राबादमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हा सोहळा पार पडला.

## आरएसपुरामध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला

**जम्मू :** बीएसएफने रविवारी जम्मू-काश्मीरच्या आरएसपुरामध्ये सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला आहे. यादरम्यान जवानांनी शस्त्रास्त्र तसेच दारूगोळा हस्तगत केला आहे. शनिवारी रात्री उशिरा सीमा ओलांडू पाहणाऱ्या घुसखोराच्या हालचाली बीएसएफ जवानांनी टिपल्या होत्या.

# मनकामेश्वर मंदिरात बाजारातल्या प्रसादावर बंदी!

## तिरुपती लड्डू प्रसाद वादानंतर निर्णय

**लखनौ :** आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिराच्या प्रसादात भेसळ झाल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणाचा परिणाम देशातील अन्य मंदिरांवरही होताना दिसत आहे. अनेक मंदिरांनी आपल्या प्रसादाबाबत दक्षता वाढवली आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशमधील लखनौतील मनकामेश्वर मंदिरात बाजारातून खरेदी केलेल्या प्रसादावर बंदी घालण्यात आली आहे. आम्ही भाविकांनी बाहेरून विकत आणलेला प्रसाद मंदिरात घेण्यास नकार दिला. या संदर्भात एक पत्र जारी केले असून, भक्तांनी गर्भगृहात अर्पण करण्यासाठी घरातून तयार केलेला प्रसाद किंवा सुका मेवाच प्रसाद म्हणून द्यावा, अशी माहिती मनकामेश्वर मंदिराचे महंत दिव्यगिरी यांनी दिली.

# कमिशन बंद झाल्यानेच माझी बदनामी - डॉ. प्रमोद सावंत

देशोन्नती वृत्तसंकलन

**पणजी :** जमीन हडप प्रकरणी सरकारने केलेल्या कारवाईमुळेच काही जणांची दलाली बंद झाली आहे. कमिशन बंद झाल्यामुळे समाजमाध्यमांवर व्हिडिओ प्रसारित करून माझी बदनामी सुरू आहे. भारतीय जनता पक्षाच्या डबल इंजिन सरकारवर गोमंतकीय जनतेला पूर्ण विश्वास आहे. गोमंतकियांनी

## डबल इंजिन सरकारवर गोमंतकियांचा पूर्ण विश्वास



बदनामीकारक व्हिडिओला बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले आहे.

# तब्बल ८ वर्षांनी पोलर बेअरचे दर्शन

वृत्तसंस्था

**रेईकजेवीक :** आईसलँडमधील एका दुर्गम गावात तब्बल ८ वर्षांनंतर पोलर बेअरचे दर्शन झाले. सुरवातीला ज्यांनी हे दृश्य पाहिले त्यांना आनंद झाला मात्र शांत दिसणाऱ्या या अस्वलाने पुढील काहीच क्षणात चक्क एका वृद्ध महिलेवर हल्ला केला. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता महिलेचा बचाव करत त्या अस्वलास पॉइंट ब्लँकवर ठार केले.

पोलर बेअर हे सहसा आईसलँडच्या क्षेत्रात नैसर्गिकरित्या आढळत नाहीत. ते या भागात ग्रीनलँड किंवा आर्टिक क्षेत्रातून बर्फाच्या तुकड्यांवर बसून शिकारीच्या आशेने येतात व हे क्वचितच घडते. बर्फाच्या तुकड्यांवर पोलर बेअर वसाहतीत येणे म्हणजे मानव जातीसाठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल. गेली ५० हजारहून जास्त वर्षे मानवाचे या भागात वास्तव्य आहे.

## शास्त्रज्ञ करणार पोलर बेअरच्या शरीराचा अभ्यास

मृत पोलर बेअरचे वजन १५० ते २०० किलो असून, शास्त्रज्ञ त्याच्या शरीराचे परीक्षण करणार आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरल हिस्ट्रीकडे अभ्यासासाठी पाठवले जाईल. शरीरातील परजीवी, संसर्ग, अवयव आणि शरीरातील चरबीचे प्रमाण तसेच त्याची त्वचा आणि कवटीचा अभ्यास केला जाईल. आईसलँडमध्ये पोलर बेअर नैसर्गिकरीत्या आढळून येत नाहीत. कधी आलेच तर ते बर्फाच्या तुकड्यांवर बसून आर्क्टिक किंवा ग्रीनलँडच्या भागांतून येतात.

सदर घटना १९ सप्टेंबर रोजी उत्तर-पश्चिम आईसलँडमध्ये घडली. समोर आलेल्या माहितीनुसार एका घराच्या व्हरांड्यात हा पोलर बेअर गेला.

## पोलिसांनी थेट गोळीच डागली




# एका तासाच्या सुनावणीनंतर दोन महिलांना फाशी

**प्योंगयांग :** अणुशक्ती असलेल्या उत्तर कोरियामध्ये अवघ्या एक तासाच्या सुनावणीनंतर दोन महिलांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. री (३९) आणि क्यूंग (४३) या महिलांना ३१ ऑगस्ट रोजी बाजारात आणण्यात आले, जिथे त्यांना सार्वजनिकपणे आरोपांचा सामना करावा लागला. अवघ्या एका तासात सुनावणी पूर्ण झाली आणि त्याच दिवशी त्याची शिक्षा सुनावण्यात आली.

# मुंबईत भारतरत्न एल्गार महासभा

## अजिंक्य चांदणे : शरद पवारांच्या हस्ते होणार उदघाटन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठेंना साहित्य क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट सन्मान देण्यासाठी, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून मुंबईत भारतरत्न एल्गार महासभा आयोजित करण्यात आली आहे.सदरील एल्गार महासभा शुक्रवार (दि.२७) सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता पार पडणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते उपस्थित राहणार असून शरद पावर यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. अध्यक्ष म्हणून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.सुकुमार कांबळे असणार आहेत. समन्वयक म्हणून अशोक आल्हाट असणार आहेत.अशी माहिती डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी दिली.

साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे, यांना भारतरत्न देण्यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया पक्ष गेल्या अनेक वर्षापासून लढा देत



आलेला आहे. या देशात अण्णाभाऊ साठे यांचे योगदान राहिलेले आहे.त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याची अवघ्या जगाने दखल घेतली आहे. परंतु असे असताना भारत सरकारकडून साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान देण्यात आलेला नाही. त्यामुळे बहुजन चळवळीचे अण्णाभाऊ साठे आजही या सन्मानापासून उपेक्षित आहेत. दीड दिवस शाळेत जाऊन अण्णाभाऊ साठेंनी लिहिलेले साहित्य, प्रचंड ताकतीचे आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचे योगदान दखलपात्र आणि उल्लेखनीय आहे. केंद्र सरकार जाणीवपूर्वक बहुजन समाजाच्या व्यक्ती आणि त्यांचा इतिहास संपुष्टात यावा यासाठी काम करताना दिसते. म्हणूनच साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना आजही भारतरत्न हा सन्मान मिळालेला नाही. त्यामुळे डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून भारतरत्न एल्गार महासभा आयोजित केली आहे. या सभेतून साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान देण्याची मागणी केली जाणार आहे. या महासभेत राज्याच्या कानाकोपऱ्यातून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते, समविचारी नागरिक सहभागी असणार आहेत. अशी माहिती डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा भारतरत्न एल्गार महासभेचे स्वागताध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

# केजमध्ये संगीता ठोंबरे पून्हा चर्चेत

## पडघम : मतदारसंघात गाठीभेटीवर भर

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघाच्या माजी आमदार संगीता ठोंबरे या सध्या केज विधानसभा मतदारसंघात जोरदार फिरताना दिसत आहेत लवकरच विधान सभेची तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे गेल्या काही महिन्यांपासून माजी आमदार संगीता ठोंबरे या गाव दौरा करताना दिसत आहेत आमदार असताना केज मतदार संघाचा केलेला विकास या निवडणुकीत मध्ये कामी येणार आहे मागील वर्ष जरी त्या राजकारणा पासून अलिप्त असल्या तरी आता केज मतदार संघात त्यानी जोरदार तयारी चालू केली आहे त्यांना केज मतदार संघातील जनता पण चांगल प्रतिसाद देताना दिसत आहे भाजपच्या माजी असल्याने जुने भाजपचे कार्यकर्ते मा.आ.संगीता ठोंबरे सोबत दिसत आहेत २०२४ ते २०१९ या काळात केज मतदार संघाचा विकास केला केलेल्या कामाच्या जोरावर केज विधानसभाची तयारी



चालू आहे .विकास काय असतो ते केज मतदार संघाला मा.आ.संगीता ठोंबरे यांनी दाखवून दिला होता कधीच कोणत्याही कामात अडथळा आनला त्या मुळे केज मतदार संघातील जनता मा.आ.संगीता ठोंबरे यांच्या बरोबर आहे.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच पान २ वर...

# बीडमध्ये रिपाइंच्या बैठकांचे आयोजन

## आवाहन : पप्पु कागदेंच्या उपस्थितीत बैठका

बीड/प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा शनिवार (दि.५ ) ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.भव्य सत्कार सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत रिपाइंच्या वतीने बीड शहरात बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी चर्मकार सभागृह संध्याकाळी ६ वाजता, शाहूनगर रात्री ७ वाजता



तर रविवार (दि.२९) सप्टेंबर रोजी पालवन चौक सकाळी १० वाजता, अंकुश नगर सकाळी १०:३० वाजता, खोलवाट रात्री ६ वाजता, पंचशील नगर रात्री ७ वाजता, इंदिरानगर रात्री ८ वाजता, संत नामदेव नगर रात्री ८:३० वाजता, चक्रधर नगर रात्री ९ वाजता, सोमवार (दि.३०) सप्टेंबर रोजी माळीवेश रात्री ७ वाजता, स्नेहनगर रात्री ८ वाजता, गया नगर जालना रोड रात्री ८:३० वाजता,मंगळवार (दि.१) ऑक्टोबर रमाई नगर रात्री ७ वाजता, पूरग्रस्त कॉलनी रात्री ८ वाजता, बुधवार (दि.२) ऑक्टोबर रोजी नागोबा गल्ली रात्री ६ वाजता, बलभीम नगर रात्री ७ वाजता, भैय्या मस्के रात्री ८ वाजता, एकता नगर रात्री ८:३० वाजता, गुरुवार (दि.३) ऑक्टोबर रोजी गोरे वस्ती सायंकाळी ५:३० वाजता, खासबाग रात्री ७ वाजता, कागदीवेस रात्री ७:३० वाजता, राजुरीवेस रात्री ८:३० वाजता होणार आहे. रिपाइंच्या वतीने बीड शहरात होणाऱ्या बैठकांचे आयोजन रिपाइं पदाधिकाऱ्यांनी वेळेवर करावे. अशी माहिती रिपाइंचे प्रसिद्धी प्रमुख विष्णू जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# मुले पळवणारी टोळी सक्रिय?

## सतर्कता: पालकांनो मुलांची काळजी घ्या



राहुरी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील शेनवडगाव येथे अज्ञात व्यक्तींनी जिल्हा परिषद शाळेतील तिसरीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला या घटनेमुळे शेनवडगाव परिसरासह तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

राहुरी तालुक्यातील शेनवडगाव येथील सत्यम परसराम जाधव व वेदांत प्रदीप जाधव हे दोन विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता तिसरीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत ते नेहमीप्रमाणे शाळेत जात असताना पाथरे गावच्या दिशेने दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन व्यक्तींनी सत्यम जाधव या विद्यार्थ्यास पळून नेण्याचा प्रयत्न करीत असताना त्याचे चुलते नानासाहेब जाधव यांनी सदर प्रकार पाहून आरडाओरडा केला त्यावेळी काही तरुणांनी त्यांच्याकडे धाव घेतली मात्र तोपर्यंत एक जण दुचाकीवरून पळून गेला तर दुसरा व्यक्ती शेजारी असलेल्या उसामध्ये शिरला परिसरातील चारशे ते पाचशे तरुणांनी त्या उसाच्या शेतात पान २ वर...

# आरक्षण हक्क परिषदेस उपस्थित राहवे

## विजय साळवे : माजलगाव येथे होणार परिषद

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त आरक्षण हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले असुन बीड जिल्ह्यातील तमाम संविधान प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विजय साळवे यांनी केले आहे.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३० सप्टेंबर १९५६ दिनी दिल्ली या ठिकानी शेड्युल कास्ट ऑफ फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना झाली असे जाहिर केले होते. त्या अनुषंगाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी आरक्षण हक्क



परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे औचित्य साधून डॉ. राजरत्न आंबेडकर हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घोषणा करणार आहेत प्रसंगी विजय साळवे यांची स्वाभिमानी रिपब्लिकन सेना बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षामध्ये विलिन करणार आहेत.

या ऐतीहासीक आरक्षण हक्क परीषदे प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. राजरत्न आंबेडकर यांची उपस्थिती राहणार असुन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून संघर्ष योद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटिल तर प्रमुख वक्ते म्हणून मुस्लिम लॉ बोर्डचे केंद्रिय सदस्य मा. मौलाना अबु तालिब रेहमानी आदि मान्यवर परिषदेस संबोधित करणार असुन या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वाभिमानी नेते विजयदादा साळवे भूषविणार आहेत. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून रिपाईचे प्रदेशाध्यक्ष दिनेश हनुमंते , उद्योजक तथा संपादक विजयकुमार वाव्हळ , वैभव धबडगे , सिद्धार्थ गायकवाड , ड रामजी कांबळे , ऋषिकेश बेद्रे , चंद्रकांत शेजूळ , अप्पासाहेब जाधव , राजेश साळवे , शेख मंजूर , बी.जी. शिंदे , पान २ वर...

# संभाजीनगरमध्ये पेन्शन संबंधित मेळावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभाजीनगर व मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील माजी सैनिक पेन्शन व स्पर्श संबंधी असलेल्या अडचणी चे निवारण करण्यासाठी दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा विभागातील सर्व माजी सैनिक ,वीर नारी, वीर पिता ,वीरमाता ,व सर्व वयोवृद्ध सैनिकांकरिता ९७ आर्टिलरी ब्रिगेड येथील सर्वत्रा ऑडिटोरियम छावणी येथे सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळेत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पेन्शन व स्पर्श संबंधी सैनिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना, बीड ,परभणी ,हिंगोली, नांदेड, लातूर ,धाराशिव या जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक वीर नारी वीर माता-पिता व वयोवृद्ध सैनिकांसाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्यात पेन्शन व स्पर्श संबंधी व अन्य अडचणीचे निरासन करण्याकरिता प्रधान नियंत्रण रक्षा लेखा कार्यालय पुणे येथील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. वन रँक वन पेन्शन व अन्य शासकीय योजना बाबत माहिती व मार्गदर्शन प्रधान नियंत्रक रक्षा लेखा कार्यालय पुणे येथील प्रतिनिधी मार्फत करण्यात येणार आहे. ज्या माजी सैनिकांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना पेन्शन व स्पर्श संबंधी अडचणी असतील त्यांनी येताना पेन्शन संबंधी सर्व मूळ कागदपत्रे व अडचणी संबंधातील हिंदी किंवा इंग्रजी मध्ये तीन प्रतीत अर्ज घेऊन यावा. ज्या माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना लिहिणे बोलणे व आपली बाजू मांडणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या कुटुंबातील योग्य व्यक्तीस सोबत आणावे म्हणजे प्रतिनिधी प्रधान नियंत्रण रक्षा लेखा कार्यालयाच्या प्रतिनिधी सोबत आपली बाजू मांडू शकेल .त्यामुळे त्यांचे निरासन करण्यास मदत होईल. सदर मेळाव्यास येणाऱ्या सर्व माजी सैनिकांकरिता मध्यवर्ती बस स्थानक, सिडको बस स्थानक व रेल्वे स्टेशन ते ९७ आर्टिलरी ब्रिगेड सर्वत्रा अडॉटोरीयम पान २ वर...

# बदलापूर एन्काऊंटर करून कोणाला वाचवायचा प्रयत्न?

## उत्कर्षा रूपवते : एन्काऊंटरचा पायंडा कायद्यासाठी धोकादायक

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुन्हेगारांना सायंकाळी पाचनंतर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाऊ नये असा नियम आहे. तरी सुद्धा बदलापूर येथील आरोपीला सायंकाळी दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाण्यात येत होते. एखादे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना अशा प्रकारचा न्याय देण्याचा पायंडा पोलिसांकडून पाडला जात असेल, तर तो पुढील सर्व कायदेशीर प्रक्रियेसाठी धोकादायक आहे. एन्काऊंटर करून नेमके कुणाला वाचवण्याचा प्रयत्न होत आहे असा सवाल वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रूपवते यांनी केला आहे.

बदलापूर घटनेतील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस कोठडीमध्ये असताना मृत्यू झाला आहे. पहिल्यांदा असे



सांगण्यात आले की, त्याने आत्महत्या केली आणि नंतर असे कळले की, त्याची पोलीस कोठडीमधून बदली होत असताना त्याने तेथील पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर गोळीबार केला आणि याचा प्रतिकार करताना त्यावर पोलिसांनी गोळीबार केला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. यातील बऱ्याच गोष्टींचा खुलासा अजूनही झालेला नाही असेही त्यांनी म्हटले आहे.रूपवते म्हणाल्या की, आपण कोणत्याही बलात्काऱ्याबद्दल कुठलीही सहानुभूती दर्शवत नाही. न्यायप्रविष्ठ प्रक्रिया ही तिच्या पद्धतीने पुढे गेली पाहिजे. त्यामध्ये अशा प्रकारचे हस्तक्षेप व्हायला नकोत. बदलापूर प्रकरणातील तीन गोष्टी आपण प्रामुख्याने लक्षात घेतल्या पाहिजे. ज्या शिक्षण संस्थेत हे प्रकरण घडलं तेथील शिक्षक, पदाधिकारी यांची यामध्ये नावे आहेत. आजतागायत त्यांच्यावर कसलीही कारवाई झाली नाही. अक्षय शिंदे याचा बळी देऊन यांना वाचवण्याचा प्रयत्न होता का हे पुढे आले पाहिजे .दोन दिवसांपूर्वी अक्षय शिंदे याने त्याचा गुन्हा कबूल केला पान २ वर...

# चळवळीतले अभ्यासू नेतृत्व हरपले!

## दुःखद:प्रा.वसंत कांबळेंचे हृदयविकाराने निधन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्त्व व सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रसिद्ध मिलिंद महाविद्यालयाचे प्रा. वसंत कांबळे सरांचे मंगळवार दि.२४ रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले.वसंत कांबळे सर हे बौद्ध धम्मकार्यात सतत अग्रेसर असणारे, परळी शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक,राजकीय,सांस्कृतिक,फुले शाहु आंबेडकर चळवळीत सक्रिय योगदान देणारे ते नेते होते.वसंत कांबळे सरांना मंगळवार दि.२४ रोजी पहाटे ३ वाजून ३० मिनिटांनी त्यांना माधवबाग येथील त्यांच्या घरी हृदयविकाराचा झटका आला. तात्काळ त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.



आंबेडकरी चळवळीतील अनेक आंदोलनात, सामाजिक कार्यात ते नेहमी अग्रेसर असायचे.हरहुन्नरी नेतृत्व हरपल्याने सर्व क्षेत्रात दुःखाचे सावट व शोककळा पसरली आहे. दिवंगत वसंतराव कांबळे सरांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा पान २ वर...

## डॉ.दीपाताई क्षीरसागर : बालरंगभूमी परिषदेचा स्तुत्य उपक्रम

# राज्यात प्रथमच बाल दिव्यांग महोत्सव

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था बालरंगभूमी परिषद प्रत्येक जिल्हास्तरावर दिव्यांग महोत्सव घेणार आहे. ५ ऑक्टोबरला बीड दिव्यांग महोत्सवापासून याची सुरूवात होणार असल्याची माहिती बीड शाखेच्या अध्यक्ष तथा बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली आहे.

बालरंगभूमी परिषद आपल्या व्याप्तीनुसार मुलांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य करत असताना विशेष मुलांना सुध्दा व्यासपीठ उपलब्ध व्हावे. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव, प्रोत्साहन देवून त्यांना सक्षम मुलांच्या प्रवाहात आणण्यासाठी 'यहाँ के हम सिंकदर' हा विशेष मुलांच्या




कलागुण सादरीकरणाचा एक प्रयत्न आहे. शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या परिसरात दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळपासून सुरू होणार्या महोत्सवात बीड जिल्ह्यातील जवळपास २५ दिव्यांग शाळांचा सहभाग



असणार आहे. यात कर्णबधीर, मुकबधीर, अंध, मतिमंद, अस्थिव्यंग अशा अनुदानित, विनाअनुदानीत शाळांचा सहभाग घेता येणार आहे. अंदाजे २०० विद्यार्थी सहभागी होतील. विशेष मुलांच्या गुण कौशल्याचे कौतुक करणारा हा महोत्सव असून ही स्पर्धा नाही. यात नाटक, नक्कला, गाणे, नृत्य, रांगोळी, चित्र योगा, वाद्यवाजवणे, पान २ वर...

### नोंदणी, अधिक माहितीसाठी संपर्क साधावा

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्कासाठी विजय राख ९८३३३४५८०९, दिपक जमधाडे ८८८८८५०३५८, नामदेव साळूंके ८३०८३६३३३५, सुरेश थोरात ९४२२९११०९०, मिलींद शिवणीकर ९४२२९३०४९०, अमित गाडे ८८८८९५९७९२, प्रदिप भोकरे ९८२२५९९६९७, अक्षय फुलझळके ९६३७९९९६२९, सुरेश साळूंके ९८२३६०१४८० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन!

## दिलासा: ब्राह्मण समाजाने मानले आभार!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

ब्राह्मण समाजाला स्वतंत्र भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून ५० कोटीचा भरभरून निधीही उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्य सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. या अनुषंगाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने आज आभार व्यक्त करण्यात आले.

महायुती सरकारने काल पार पडलेल्या कॅबिनेट बैठकीत ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र भगवान परशुराम आर्थिक महामंडळ स्थापन केले.अनेक दिवसांपासून जिव्हाळ्याचा प्रश्न शासनाने मार्गी लावला. राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार , प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे ,कृषी मंत्री ना.धनंजय पान २ वर...